MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा • ठाणे

व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष चौदावे / अंक ११ / नोव्हेंबर २०१३

## संपादकीय

### भारतीय नेत्यांचा 'इतिहास'

अमेरिकेतील स्टॅच्यू ऑफ लिबर्टीच्या दुप्पट उंचीचा सरदार पटेलांचा स्टॅच्यू ऑफ युनिटी हा पुतळा उभारून भाजपचे पंतप्रधानपदाचे उमेदवार व गुजरातचे मुख्यमंत्री सरदार पटेलांची 'उंची वाढवण्याचा' प्रयत्न सध्या करत आहेत. हे करत असतानाच त्यांचे सारे समर्थक, सरदार पटेल यांचे समकालीन (विशेषतः पं. नेहरू) कसे खुजे होते हे अप्रत्यक्षपणे दाखविण्याचा प्रयत्न करीत आहेत. यातून काही राजकीय लाभ होणार असतीलही. निवडणुकीसाठी राजकारणी मंडळी दुसऱ्या पक्षाचे उणेदुणे काढतात. निवडणुकीत जिंकून यावयाचे असेल, तर काही प्रमाणात यामागील वृत्ति-प्रवृत्ती आणि मानसिकता समजून घेण्यासारखी असते.

पण अशा प्रचारांच्या धुराळ्यात हल्ली इतिहासाचा स्वतःच्या भल्यासाठी वापर केला जाऊ लागला आहे. ऐतिहासिक घटनांच्या संदर्भात कोणीही उठतो आणि कोणावरही चिखल फेक करतो. ज्या इतिहासाचा व आपला काडीचाही संबंध नाही, त्या इतिहासावर तोंडाची वाफ वाया घालवतो. इतिहासाची आपल्या मर्जीप्रमाणे अशी ओढाताण करतो. ज्या व्यक्तिमत्त्वांची नावे घ्यावयाची लायकीही नाही असे तथाकथित बोटभर उंचीचे नेते, उमेदवार इतिहासाचे खेळणे करून टाकतात. ज्यांची उंची मोजण्याची कोणतीही फूटपट्टी असणे शक्य नाही. त्यांचे जगातील सर्व पुतळ्यांपेक्षा मोठे पुतळे बनवून त्या जोरावर भूमिपूजने उरकणारी ही नेतेमंडळी पाहिली की हसूच येते. एखादा पुतळा वा स्मारक आपल्या खाजगी आवारात श्रद्धा म्हणून उभारले जाणे याला काही अर्थ आहे. परंतु गेल्या वर्षापासून वाद चालू असलेल्या एका नेत्याच्या नावापासून ते आंबेडकर, पटेल यांच्या नावापर्यंत जी बोंबाबोंब चालू आहे; ती पाहता निर्बुद्ध नेतृत्त्व केविलवाणे अनुयायी किती अक्कल शून्य असतात ते समजून येते. लोकांच्या दैनंदिन प्रश्नांवर, समस्यांवर चर्चा होण्याऐवजी, स्फूर्ती घेण्याऐवजी इतिहासाच्या नवनवीन विकृत अवृत्या काढण्याचा उद्योग चालू आहे.

(पृष्ठ क्र २ वर)

(मुखपृष्ठावरून – **संपादकीय**)

ज्या पटेल, नेहरू आणि गांधी यांच्या दृष्टिकोनांचा, मतांचा घोळ घालणे चालू आहे आणि यापैकी पटेलांना पंतप्रधानपद मिळाले असते तर काय...वगैरे हवेतले बाण सोडले जात आहेत. ते पाहता आमचा इतिहासाचा अभ्यासच नाही असे म्हणावे लागते.


देशाच्या राजकारणात पटेल आमचेच अशी भूमिका घेऊन इतिहासातील विविध संदर्भ आपल्या सोयीप्रमाणे बदलण्याची अहमहमिका चालू आहे. त्या करता इतिहासाची मोडतोड केली जात आहे.

नेहरु, गांधी, पटेल, राजाजी यांच्यापैकी कोणीही धर्मवादी नव्हते आणि एखाद्या धर्माबद्दल धार्जिणेही नव्हते. हे सर्व 'सेक्युलर' राजकारणी होते, म्हणून ते एकत्र नांदू शकले. फार मोठ्या माणसांना निवडणुकीच्या तिकीटासाठी लहान करणे हा इतिहासावर अन्याय करणारा उद्योग आहे. तसाच या मोठ्या माणसांनाही लहान करणारा आहे.


भारतरत्न सरदार पटेलांच्या आणि महात्मा गांधींच्या संदर्भातील सर्व साहित्य अनेक खंडात आज उपलब्ध आहे असे असताना माध्यमांचा गैरवापर करणे हे या मूठभर उंचीच्या नेत्यांकडून चालू आहे. पुतळे, स्मारके उभारून किंवा छायाचित्रे लावून देश 'सुजतो' मोठा होत नाही. वर्षाचे ३६४ दिवस (३६५ वा दिवस सोडून) या सर्वांवर साठणारी धूळ, यावर शिटणारे पक्षी आणि यांच्या पायथ्याशी बेवारशी कुत्र्यांना होणारी पिले हे ह्यांच्या अस्तित्वाचे फलित आहे काय? कुसुमाग्रजांच्या या विषयावरील एका कवितेची आठवण होते. ज्यामध्ये रात्री पुतळ्यांची सभा भरते व बंडाची भाषा सुरू होते. एका हिंदी चित्रपटात महात्मा गांधी सांगतात की माझे पुतळे, स्मारके, छायाचित्रे काढून फेकून द्या. मला आपल्या मनात जागा द्या आणि देशासाठी काम करा, तेच माझे स्मारक होईल. चित्रपट गल्ला भरत असला तरी या सांगण्यात फार मोठा आशय दडला आहे. देशातल्या तथाकथित पक्षांनी 'पटेल आमचे' असे म्हणत जी ओढाताण केली त्यापेक्षा आजच्या देशाचा नकाशा तयार करण्यासाठी त्यांनी जे काम केले त्यासाठी कृतज्ञ तरी रहा.

**– मोहन पाठक**

●●●



**महात्मा गांधी**



**वल्लभभाई पटेल**



**जवाहरलाल नेहरू**

वर्ष चौदावे/अंक ११/नोव्हेंबर २०१३

वर्ष चौदावे/अंक ११ /नोव्हेंबर २०१३

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

**कार्यकारी संपादक**
श्री. मोहन पाठक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष १८ वे/अंक ५ वा)

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे – ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
www.vpmthane.org

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
Email : perfectprints@gmail.com

## *अनुक्रमणिका*

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | श्री. मोहन पाठक | |
| २) | फेरफटका ऑक्सफर्ड विद्यापीठ परिसरातून | डॉ. सुधाकर आगरकर | ३ |
| ३) | नरबळी ... अध्यादेश, २०१३ | प्रा. विनोद एच. वाघ | ८ |
| ४) | श्रीमत् भगवद् गीता – अध्याय दहावा<br>विषय : विभूति योग | कै. शं. बा. मठ | ११ |
| ५) | ''उंच माझा झोका'' | श्री. मोहन पाठक | १६ |
| ६) | नर्मदा परिक्रमा<br>भाग : १ | सौ. मंगला अशोक वझे<br>श्री. अशोक माधव वझे | १८ |
| ७) | परिसर वार्ता | संकलित | २५ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. दिशाच्या संदर्भात

- आपण दिशा नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- हे व्यासपीठ अभ्यासपूर्ण लेखांसाठी आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून दिशाला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: देणगी मूल्य द्या व इतरांना द्यायला सांगा.
- आपले देणगी मूल्ये द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात देणगी मूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर नौपाडा, ठाणे ४००६०२ या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेची देणगी मूल्य पाठवावी.
- www.vpmthane.org या संकेत स्थळावर दिशाचे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक देणगी मूल्याच रु. २५०/- चा धनादेश ‘विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा’ या नावाने पाठवावा.

– संपादक

# फेरफटका ऑक्सफर्ड विद्यापीठ परिसरातून

*डॉ. सुधाकर आगरकर यांनी ऑक्सफर्ड विद्यापीठ परिसराबद्दल त्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण शैलीत सादर केलेला लेख - संपादक*

ऑक्सफर्ड विद्यापीठ हे १२ व्या शतकात स्थापन झालेले अतिशय जुने असे विद्यापीठ आहे. या विद्यापीठात ३८ कॉलेजेस असून विद्यापीठाने चालविलेली संग्रहालये आणि वाचनालये आहेत. ही सगळी एवढी जवळजवळ आहेत की पायी फिरून ती बघता येतात. म्हणूनच ऑक्सफर्ड भेटीमधला सुमारे तीन तासाचा अवधी आम्ही विद्यापीठातून फेरफटका मारण्यासाठी वापरतो. आमची निवासाची व्यवस्था रेल्वे स्टेशनजवळ असलेल्या युथ हॉस्टेलमध्ये केलेली होती. तेथूनच आम्ही आमच्या फेरफटक्याला सुरुवात केली. त्या तीन तासाच्या कालावधीत काय काय बघितले आणि कोणती नवीन माहिती गोळा केली याची माहिती या लेखात दिलेली आहे.

युथ होस्टेलमधून बाहेर पडून आम्ही शहराच्या मध्यभागाकडे चालू लागलो. सिग्नल ओलांडून जरा पुढे गेलो तर आम्हांला नवीन पद्धतीने बांधलेली एक प्रशस्त इमारत दिसली. सैद बिझिनेस स्कूल (Said Business School) अशी पाटी या इमारतीजवळ आहे. त्यावरून ही बिझिनेस इन्टिट्यूट असल्याचे आमच्या लक्षात आले. परंतु त्याचे नाव सैद का हा प्रश्न मात्र आम्हांला पडला. सैद नावाच्या मध्यपूर्वेतील एक मोठा व्यापारी होता. त्याने मोठी देणगी देऊन या संस्थेची स्थापना केली. म्हणून त्याचेच नाव या संस्थेला दिलेले आहे. आता ही संस्था ऑक्सफर्ड विद्यापीठाचा एक विभाग म्हणून कार्य करते.

आम्ही आपले चालणे चालूच ठेवले. मध्ये एक नाला येतो. तो ओलांडून डावीकडे वळलो तर प्रशस्त दगडी इमारत आमच्या नजरेस पडली. या इमारतीचे नाव ॲशमोलिन संग्रहालय असे आहे. इलियास अशमोल (Ellias Ashmole) नावाच्या व्यक्तीने आपल्याकडील संग्रह विद्यापीठाला दान केला; म्हणून त्याचेच नाव या संग्रहालयाला दिलेले आहे. ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या पुरातत्व विभागाने चालविलेल्या या संग्रहालयात प्राचीन वस्तूंची भरमारच आहे. त्याचबरोबर प्राचीन चित्र आणि कलाप्रदर्शन यांवरदेखील भर आहे. या संग्रहालयाला दुसऱ्या दिवशी भेट द्यायची असे ठरवून आम्ही पुढे गेलो.



**ॲशमोलियन संग्रहालयाचा दर्शनी भाग**

ॲशमोलियन संग्रहालय पार करून आपण एका चौकात येतो. जवळच एक रॅन्डाल्फ नावाचे हॉटेल आहे. त्याच्याच बाजूच्या इमारतीत एक कार्यालय आहे. त्याचे नाव ऑक्सफर्ड सेंटर फॉर हिंदू ॲन्ड वैष्णव स्टडीज (Oxford Centre for Hindu and Vaishnava Studies) असे आहे. नावात उल्लेख केल्याप्रमाणे हिंदू आणि वैष्णव धर्माचा अभ्यास करणारे हे केंद्र आहे. शौनक दास नावाचे मूळचे आयरिश असलेले एक मितभाषी गृहस्थ या संस्थेचे संचालक आहेत. ऑक्सफर्ड विद्यापीठाचा एक विभाग

म्हणून हे केंद्र कार्य करते. येथे संशोधन आणि शिक्षणाचे काम करण्यात येते. भारतीय धर्मग्रंथांचा येथे फार खोलवर अभ्यास केला जातो. या विषयावर पी.एचडी. मिळविण्यासाठी काही विद्यार्थी संशोधन करताना आम्हांला तेथे आढळले.




**युद्धात कामी आलेल्या सैनिकांचे स्मारक**

हिंदू केंद्रातून बाहेर पडलो तर एक लांबलचक शॉपिंग स्ट्रीट आम्हाला खुणावत होते. तिकडे लक्ष न देता आम्ही ब्रॉड स्ट्रीटकडे आमचा मोर्चा वळविला. कारण या स्ट्रीटवरच अनेक कॉलेजेस आहेत. आम्ही ब्रॉड स्ट्रीटवर जाऊ लागलो, तसे डाव्या बाजूला आम्हांला बॅलिआल (Balliol) कॉलेज लागले. त्याच्यापुढे रस्त्यावर एक दगडाचा क्रॉस केलेला आहे. हे ऑक्सफर्डमधील एक महत्त्वाचे ठिकाण आहे. १६ व्या शतकात कॅथलिक पंथाच्या नियमांना येथील काही लोकांनी विरोध केला. त्यावेळेस विरोधकांना जाळून येथेच पुरण्यात आले. या घटनेची माहिती जवळच फलकावर लावलेली आहे. कालांतराने कॅथलिक पंथाला झुगारून इंग्लंडवासियांनी प्रोटेस्टंट हा पंथ स्वीकारला. परंतु त्यासाठी काही सुधारणावाद्यांना आपला जीव नाहक गमवावा लागला होता.



**कट्टर पंथियांच्या विरोधकांना येथे जाळण्यात आले**

क्रॉसजवळच मुले फार वेळ घुटमळत राहिली. अशाने सहल ठरलेल्या वेळेत पूर्ण होणार नाही. म्हणून त्यांना तेथून काढून झपाझप पावले टाकत आम्ही पुढे गेलो. तशी आमची नजर दोन दगडी इमारतींवर पडली. त्यातल्या एका इमारतीच्या कंपाऊंडवर शास्त्रज्ञाचे पुतळे उभारलेले आहेत. त्यावरून त्या इमारतीबद्दल आम्हांला पुसटशी कल्पना आली. जवळ जाऊन बघतो तर ते विज्ञान-इतिहास संग्रहालय (History of Science Museum) होते. त्याच्यापुढची एक इमारत मात्र जरा विचित्रच वाटत होती. चौकशीअंती असे कळले की त्या इमारतीला शेल्डोनियन थिएटर (Sheldonian Theatre) असे नाव आहे. ख्रिस्तोफर रेन (Christopher Rhein) नावाच्या प्रसिध्द वास्तुविशारदाने या इमारतीची रचना केली होती. या इमारतीचे बांधकाम १६६४-१६६८ या कालावधीत केले गेले. त्या काळात गिल्बर्ट शेल्डन (Gilbert Sheldan) हे विद्यापीठाचे कुलपती होते. म्हणून त्यांचे नाव या इमारतीला देण्यात आले. या इमारतीचा उपयोग विद्यापीठ पदवीदान समारंभ, भाषणे, सभा, संगीताचे कार्यक्रम इत्यादिसाठी केला जातो.


---

सत्य हे कडवट चवीचे पण मधाच्या गुणाचे औषध आहे.



**शेल्डोनियन थिएटर**

शेल्डोनियन थिएटर बघत बघत आपण एका चौकात येतो. या चौकात एका बाजूला इंडियन इन्स्टिट्यूटची इमारत आहे. ऑक्सफर्डमध्ये भारतीय संस्था पाहून आपल्याला जरा आश्चर्यच वाटले. इंग्रज जेव्हा भारतात आले तेव्हा येथील संस्कृती ती आणि ज्ञानोपासना पाहून ते अचंबित झाले. भारताचा अभ्यास आपल्याला ज्ञानाची अनेक कवाडे उघडेल, याची त्यांना जाणीव आली. म्हणून भारताबाबत अभ्यास करण्यासाठी ही स्वतंत्र संस्था ऑक्सफर्डमध्ये १८८३ मध्ये स्थापन करण्यात आली. सर मोनियर विलियम्स (Monier Wiliams) यांनी या संस्थेच्या स्थापनेत पुढाकार घेतला. कालांतराने तिचा उपयोग भारतात पाठविल्या जाणाऱ्या सनदी नोकरांना प्रशिक्षण देण्यासाठी करण्यात येऊ लागला. १९६८ मध्ये या इमारतीत इतिहास विभाग सुरू करण्यात आला. असे जरी असले तरी, भारतीयत्वाचे अनेक अवशेष येथे कायम आहेत. इमारतीच्या दर्शनी भागात हत्ती कोरलेले असून प्रवेशद्वार इतर कोरीव कामही केलेले आहे. याखेरीज प्रवेशद्वाराजवळ एक संस्कृत वचन लिहिलेला फलक आहे. या संस्थेतील पुस्तके आता बोडलिन वाचनालयात एका वेगळ्या विभागात ठेवलेली आहेत.



**इंडियन इन्स्टिट्यूटचे प्रवेशद्वार**

इंडियन इन्स्टिट्यूट पाहून झाल्यावर आपण डावीकडे जावे की उजवीकडे असा संभ्रम निर्माण झाला. पण प्रथम उजवीकडे जावे आणि नंतर परत येऊन डावीकडे जावे असे ठरले. त्यानुसार आम्ही चालू लागलो. रस्त्याच्या डाव्या बाजूला हर्टफर्ट कॉलेज तसेच ऑल सोल कॉलेज दिसतात. उजव्या बाजूला एक प्रचंड इमारत असून तिला मोठे प्रवेशद्वार असल्याचे आमच्या लक्षात आले. प्रवेशद्वारातून आत गेल्यास आपण एका मोठ्या पटांगणात येतो. या पटांगणात एक पुतळा असून येथे Bodelein असे लिहिले आहे. त्याचबरोबर आजूबाजूच्या दालनांना लावलेल्या दारांवर लॅटिनमध्ये माहिती लिहिलेली आहे. आम्ही बोडलिन वाचनालयाच्या प्रांगणात होतो. थॉमस बोडलिन नावाच्या माणसाने आपल्याकडील सर्व पुस्तकांचा संच विद्यापीठाला दिला आणि विद्यापीठाचे वाचनालय समृध्द करण्याचा प्रयत्न केला. म्हणून त्याच्या नावाने हे वाचनालय चालविले जाते. विद्यापीठात असलेल्या प्राध्यापकांसाठी आणि विद्यार्थ्यांसाठी एक संदर्भ ग्रंथालय म्हणून त्याचा उपयोग होतो. इंग्लंडमधील हे दुसऱ्या क्रमांकाचे ग्रंथालय असून लंडनच्या ब्रिटिश लायब्ररीपेक्षा थोडी कमी पुस्तके येथे आहेत. या ग्रंथालयाला भेट देऊन एक वेगळा लेख लिहिला आहे.

---

स्वतःबद्दलचा दृढ आत्मविश्वास आणि हसरा चेहरा हे स्मार्टनेसचे प्रतीक आहे.



**थॉमस बोडलिन यांचा पुतळा**

बोडलिन ग्रंथालयाच्या प्रांगणातील एका बोळातून आम्ही बाहेर पडलो तर आम्हाला एक सुंदर गोलाकार इमारत दिसली. या इमारतीचे नाव रॅडक्लिफ कॅमेरा (Radchliffe Camera) असे आहे. जॉन रॅडक्लिफ नावाच्या डॉक्टरला तेव्हा विज्ञानाची पुस्तके ठेवता येतील असे वाचनालय बांधायचे होते. त्याने पुढाकार घेऊन १७३७ ते १७४९ या कालावधीत या इमारतीचे बांधकाम केले. जेन्स गिब्स (Jaunes Gibbs) नावाच्या वास्तूविशारदाने या इमारतीचा आराखडा तयार केला. आज ही इमारत म्हणजे ऑक्सफर्ड शहराची ओळख झालेली आहे. सध्या ही इमारत बोडलिन ग्रंथालयाचा भाग असून या गोलाकार इमारतीत एक प्रशस्त वाचनालय निर्माण केलेले आहे.



**रॅडक्लिफ कॅमेरा**

स्टेशनपासून निघून रॅडक्लिफ कॅमेऱ्यापर्यंत आम्ही चालत आलो. बाहेर खूप गारवा होता. आम्ही पुरेसे कपडे घातलेले होते; तरी थंडी जाणवत होती. त्यामुळे चहा आणि विश्रांतीची गरज जाणवत होती. आजूबाजूला काही सोय आहे का म्हणून आम्ही शोध घेऊ लागलो तर जवळच असलेल्या चर्चमध्ये एक जुने कँटीन असल्याचे आमच्या लक्षात आले. तेथे आम्ही गेलो. चहा घेतला आणि ताजेतवाने होऊन पुढच्या भटकंतीला सुरुवात केली. जेथे आम्ही चहा घेतला, ते सेंट मेरी द व्हर्जिन नावाचे चर्च होते. या चर्चच्या वरच्या मजल्यावर जाऊन गच्चीवरून ऑक्सफर्डचे दृश्य पाहण्याची संधी मिळते. त्यासाठी शुल्क भरावे लागते. आम्ही तिकीट काढून पायऱ्या चढून वर गेलो. वरून दिसणारे दृश्य खरोखर विलोभनीय असेच होते. आम्ही अनेकांनी आपापले कॅमेरे काढून पटापट फोटो घेतले आणि खाली आलो. त्यानंतर आम्ही प्रत्यक्ष चर्चमध्ये गेलो. कारण तेथे एक महत्वाच्या ठिकाणाला आम्हांला भेट द्यायची होती. चर्चच्या हॉलमध्ये एका बाजूला विलियम जोन्स (William Jones) या गृहस्थाचा पुतळा आहे. या माणसाने १७८५ साली मनुस्मृतीचे इंग्रजीत भाषांतर केले. एवढा मोठा ज्ञानसाठा इंग्रजीत उपलब्ध करून दिला, म्हणून त्याचा सन्मान करण्यासाठी हा पुतळा उभारलेला आहे. याहीपेक्षा मोठा पुतळा लंडनच्या सेंट पॉल चर्चमध्ये असल्याचे आम्हांला कळले.




**विलियम जोन्स यांचा साधू वेषातील पुतळा**

मरणाचे नेहमी स्मरण ठेवा पण मरणाची इच्छा बाळगू नका.

चर्चची भेट संपवून आम्ही निघालो. इंडियन इन्स्टिट्यूट पासून पुढे चालत जाऊन आम्ही इतिहास विज्ञान संग्रहालयापर्यंत गेलो. वाटेत आम्हाला दोन्ही बाजूला अनेक कॉलेजेस लागली. त्याकडे लक्ष न देता पुढे चालत जाण्याचा आमचा विचार होता. परंतु ट्रिनिटी कॉलेजच्या प्रवेशद्वाराने आणि त्यातून दिसणाऱ्या लॉनने आमचे लक्ष वेधून घेतले. तेथे थांबून आम्ही काही फोटो घेतले.



**ट्रिनिटी कॉलेजचे प्रवेशद्वार**

लगेच संग्रहालयाजवळ पोहोचलो. येथे दोन संग्रहालये आहेत. एकतर निसर्ग इतिहास संग्रहालय आणि दुसरे पिट्स रिव्हर संग्रहालय. या दोन्ही संग्रहालयांच्या भेटीवर स्वतंत्र लेख लिहिलेले आहेत.



**निसर्ग इतिहास संग्रहालय**

संग्रहालय ओलांडून आम्ही पुढे गेलो ते एका बागेत. ही बाग विद्यापीठाची असून त्याची देखभाल विद्यापीठच करते. याखेरीज विद्यापीठाने चालविलेले एक स्वतंत्र बोटॅनिकल गार्डन आहे. ते ठिकाण येथून दूर आहे. बरीच पायपीट झाली होती. थकवा जाणवायला लागला होता. त्याचबरोबर पोटात कावळे ओरडायला लागले होते. म्हणून, आम्ही बागेतील योग्य जागा शोधून आपापले डबे खायला सुरुवात केली.



**विद्यापीठाची सुंदर अशी बाग**

**– डॉ. सुधाकर आगरकर**
सी–१४, विसावा वैभव नगरी,
कल्याण शीळ रोड,
काटई, ता. कल्याण
जि. ठाणे – ४२१२०४

●●●

*दिशा संपर्क दूरध्वनी*
**०२२-२५४२ ६२७०**

# नरबळी ... अध्यादेश, २०१३

*नरबळी ... अध्यादेश, २०१३ चे थोडक्यात विवेचन – संपादक*

एखादे चांगले काम करण्यापूर्वी एखाद्या प्राण्याचा (कधी कधी मनुष्य प्राण्याचादेखील) बळी देण्याची प्रथा या महाराष्ट्रात किंबहुना संपूर्ण भारतात होती व आहे, याबद्दल कुणाच्याही मनात संशय असता कामा नये. वैदिक काळामध्ये इंद्राला व इतर देवतांना प्रसन्न करण्यासाठी प्राण्यांचे बळी देण्याची प्रथा होती, असे काही दाखले सांगतात. कदाचित तेव्हापासूनच व त्यामुळेच नवस पूर्ण करण्यासाठी प्राण्याचे बळी देण्याची प्रथा सुरू झाली असावी. ''महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अरिष्ट व अघोरी प्रथा व जादुटोणा यांना प्रतिबंध घालण्याबाबत व त्यांचे समूळ उच्चाटन करण्याबाबत अध्यादेश, २०१३'' हा कायदा नुकताच महाराष्ट्राच्या राज्यपालांनी अध्यादेशाद्वारे अंमलात आणला आहे. हा अध्यादेश अंमलात आल्यापासून अनेक भोंदुबाबाविरुद्ध कारवाई करण्यात आली आहे. मात्र हा अध्यादेश काढण्यासाठी महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्याला देखील, डॉ. दाभोळकरांचा बळी द्यावा लागला असे धाडसाने पण दुदैवाने म्हणावे लागत आहे.

अनेक समज–गैरसमजांतून, गोंधळांतून, वादांतून, काळोखातून सनदशीर भांडणांतनू, अथक परिश्रमातून, २० वर्षे अहोरात्र कष्ट घेऊन व एका सच्च्या कार्यकर्त्याचा (नर) बळी घेऊन अस्तित्वात आलेल्या या कायद्याचे स्वरूप म्हणूनच प्रत्येकानेच समजून घेणे आवश्यक आहे, असे मला वाटते.

एकूण ११ कलमे व एक अनुसूची असलेला हा लहानसा कायदा समाज विघातक कृत्ये करणाऱ्यास प्रतिबंध घालण्यास पुरेसा आहे. या अध्यादेशाखाली घडलेले गुन्हे हे प्रथम वर्ग न्याय दंडाधिकरी, न्याय चौकशी, महानगर दंडाधिकारी यांच्यापेक्षा कनिष्ठ न्यायलयांमध्ये चालविण्यात येणार नाही. या अध्यादेशामध्ये दक्षता अधिकाऱ्याची नेमणूक करून त्याला विविध अधिकार प्रदान केले आहेत. या अधिकारामध्ये, अध्यादेशाखाली घडणाऱ्या गुन्ह्यांची नोंद करणे, तक्रार दाखल करणे, इतर तक्रारीच्या तपासाची माहिती घेणे संबंधित पोलीस ठाण्याला योग्य तो सल्ला व मार्गदर्शन देणे, दक्षता अधिकाऱ्याच्या कामात अडसर निर्माण करणारे या अध्यादेशानुसार शिक्षेस पात्र ठरू शकतात. दक्षता अधिकारी कोणत्याही ठिकाणी जेथे गुन्हा घडत आहे किंवा घडण्याची शक्यता आहे, प्रवेश करून झडती घेऊ शकतो, कोणतेही साहित्य, उपकरण किंवा जाहिरात जप्त करू शकतो.

या अध्यादेशाखाली घडणाऱ्या गुन्ह्यांसाठी, (ज्यांची नोंद अनुसूचीमध्ये दिली आहे) सहा महिने ते सात वर्षांपर्यंतच्या कारावासाचे व रुपये पाच हजार ते रुपये पन्नास हजारापर्यंतची द्रव्य दंडाची शिक्षा देता येऊ शकते. या व्यतिरिक्त गुन्हा सिद्ध झालेल्या व्यक्तीचे नाव, त्याचा पत्ता, त्याने केलेला अपराध व एकंदर वस्तुस्थिती ही स्थानिक वृत्तपत्रामध्येदेखील प्रसिद्ध करता येवू शकते.

या अध्यादेशामध्ये असलेल्या अनुसूचीमध्ये एकूण १२ विविध प्रकारच्या गुन्ह्यांचा समावेश करण्यात आला आहे. त्यामध्ये भूत उतरविण्याचा बहाण्याने एखाद्या व्यक्तीवर अमानुष अत्याचार करणे, त्याच्या शरीरावर इजा

व जखमा करणे किंवा एखाद्या व्यक्तीने तथाकथित चमत्काराचा प्रयोग प्रदर्शित करून त्याद्वारे आर्थिक प्रगती करणे, त्यांना ठकवणे किंवा फसविणे, अलौकीक शक्तीची कृपा मिळविण्याच्या हेतूने शरीराला जीवघेण्या जखमा करणे किंवा अमानुष अनिष्ट व अघोरी प्रथांचा अवलंब करणे, भानामतीच्या नावाखाली अघोरी कृत्य आणि जादुटोणा करणे किंवा त्यासारख्या अन्य कारणाने नरबळी देणे किंवा तसा प्रयत्न करणे, इतरांना भिती वाटेल अशी धमकी देऊन त्यांचे काहीतरी बरे-वाईट होईल, असे सांगून त्याच्या मनात भीतीचे वातावरण निर्माण करणे, एखादी व्यक्ती अपशकुनी आहे, रोगराई पसरविण्यास कारणीभूत आहे अशी बतावणी करणे किंवा भासवणे व त्यामुळे अशा व्यक्तीचे जगणे मुश्किल करणे, त्रासदायक व कठीण करणे, करणी किंवा चेटुक केल्याच्या नावाखाली एखाद्या व्यक्तीला माराहाण करणे, नग्नावस्थेत धिंड काढणे किंवा तिच्या रोजच्या व्यवहारावर बंदी घालणे, भूतपिशाच्च वगैरे कारण सांगुन घबराट, दहशत निर्माण करणे, भुताचा किंवा अतिंद्रिय शक्तीचा कोप असल्याचा समज करून देवुन त्यास वैद्यकीय उपचार घेण्यापासून रोखणे व त्याऐवजी अमानुष अनिष्ट व अघोरी कृत्य वा उपाय करण्यास प्रवृत्त करणे, मूल न होणाऱ्या स्त्रीला अलौकीक शक्तिद्वारा मूल होण्याचे आश्वासन देवून तिच्याशी लैंगिक संबंध ठेवणे.

वस्तुतः वर नमूद केलेल्या गुन्ह्यांमध्ये कुठेही कुणाच्याही धर्माचा अपमान होण्याचा किंवा धार्मिक भावना दुखावतील असे काहीही नाही आणि जरी असेल तर तो एका चांगल्या धर्माचा भाग कसा असू शकेल. अंधश्रद्धेचा जन्म श्रद्धेतूनच होत असतो. एखाद्या अलौकिक शक्तीकडे (देवाकडे) त्याच्या अस्तित्वावर असलेल्या विश्वासापोटी काही तरी मागणं, म्हणजे श्रद्धा. परंतु मागितलेले मिळत नाही म्हणून त्या अलौकिक शक्तीची नाराजी दूर करण्यासाठी,तिला खूष करण्यासाठी केलेला सगळा उठाठेव, म्हणजे अंधश्रद्धा. देवाच्या अस्तित्वावर विश्वास असणे वा नसणे हा धर्मापेक्षा, व्यक्तिगत बाब असल्याचे माझे मत आहे. तसा विश्वास असला तरी तो सर्व जगाला सांगून, विश्वास नसलेल्या विरूद्ध उगाचच बंड करण्यात काही हाशील नाही. परंतु जेव्हा वादातीत अस्तित्व असलेल्या देवाकडून अनेक इच्छापूर्तीची अपेक्षा केली जाते, त्यातून नवस बोलणे, पुन्हा नवस पूर्ण होत नाही म्हणून अनेक उपाययोजना करणे व अशा लोकांच्या मनातील भीतीचा फायदा घेऊन, श्रद्धेच्या, धर्माच्या नावाखाली, अंधश्रद्धेचा धंदा याहून फसविण्याचा व लुटण्याचा कारभार सुरू केला जातो. यांतूनच अनेकाचे राजकीय, आर्थिक व धार्मिक हित साधले जाते.

इतर देशांच्या तुलनेत भारतामध्ये अंधश्रद्धेचे पालनकर्ते, प्रचारकर्ते, पुरस्करकर्ते व त्याला बळी पडणाऱ्याची संख्या खूप मोठ्या प्रमाणात आहे. पुरातन काळात निर्माण झालेली जाती व्यवस्था व ही व्यवस्था टिकविण्यासाठी निर्माण केलेले अनेक नियम, या नियमांचा प्रचार करणारी यंत्रणाच यासाठी कारणीभूत आहेत. समाजाच्या तीन चतुर्थांश घटकाला शिक्षणचा अधिकार नाकारणाऱ्या समाज व्यवस्थेमध्येच अंधश्रद्धा निर्माण होवू शकते व टिकू शकते. ती निर्माण झाल्याचा इतिहास व ती टिकल्याचा वर्तमान, या दोन्हीही गोष्टी आपल्याला माहीत आहे. आजचे शिक्षणाचे प्रमाण वाढले असले तरी शेकडो वर्षांपासून अज्ञान व मनातील भीती जाण्यासाठी ३०-३५ वर्षाचा शिक्षणाचा अनुभव पुरेसा होऊ शकत नाही. भीती हेच अंधश्रद्धेचे मूळ कारण आहे, म्हणूनच भीती घालविण्यासाठी योग्य त्या शिक्षणाची व समाज व्यवस्थेची गरज आहे. बळी पडणारे हे भीतीमुळे, अडाणीपणामुळे व अशा व्यवस्थेचे समर्थन करणाऱ्या व्यक्ती, संस्थांमुळे बही पडतात. त्यांना हा कायदा या कचाट्यातून बाहेर पडण्यास मदत करू शकतो. परंतु जाणूनबुजून एखाद्या व्यक्तीला फसविण्याचा, लुटण्याचा, ठकविण्याचा धंदा

थाटणारे, अंधश्रद्धेचा प्रचार करणारे हे या अध्यादेशाप्रमाणे गुन्हेगार आहेत. भारतीय दंड संहिता असताना या कायद्याची/ अध्यादेशांची गरजच काय असे विचारणाऱ्यांना एकच सांगावेसे वाटते की, भारतीय दंडसंहितेमध्ये अंधश्रद्धेच्या नावाखाली होणाऱ्या गुन्ह्यांचा स्पष्ट उल्लेख नसल्यामुळे याची गरज आहे. दुसरे असे की, नरबळी घेतलेल्या व्यक्तीविरुद्ध एकाच वेळी भारतीय दंड संहिता व या अध्यादेशाखाली गुन्ह्याची नोंद होऊन योग्य ती शिक्षा होवू शकते आणि म्हणून हा अध्यादेश भारतीय दंड संहितेला पूरक असाच आहे. १८२९ साली सती प्रथेविरोधात केलेल्या कायद्याला खूप मोठा विरोध झाला होता, परंतु तो कायदा किती योग्य होता हे आज आपणांस जाणवते. १८२९ साली त्या कायद्याला विरोध करणाऱ्यांची मानसिकता आपण समजू शकतो, पण २०१३ मध्ये या अध्यादेशाला विरोध करणाऱ्याची मानसिकता समजणे हे आमच्या समजण्या पलीकडचे आहे. हा अध्यादेश अंधश्रद्धा नष्ट करण्यासाठी परिपूर्ण नसला तरी ती एक सुरुवात आहे आणि म्हणूनच प्रत्येकाने त्याचे मनापासून स्वागत केले पाहिजे.

**– प्रा. विनोद एच. वाघ**
वि.प्र.मं. चे टि.एम.सी. विधी महाविद्यालय,
ठाणे.

●●●

## मो. शि. तथा बापूसाहेब रेगे

बालमोहन विद्यापिठाच्या कै.दादासाहेब रेगेंच्या परंपरा अधिक समृद्ध करणारे बापूसाहेब रेगे शिक्षण क्षेत्रातील चिंतन, प्रयोग यामुळे त्यांना शिक्षणतज्ज्ञ म्हणणे योग्य ठरेल. बापूंचा तेंव्हाच्या बालमोहनचा विद्यार्थी होण्याचे भाग्य मला लाभले.

तुमचा नम्र,
**मोहन पाठक**

नोबल पारितोषिक विजेत्या ब्रिटिश लेखिका डोरिस लेसिंग म्हणजे एक विलक्षण रसायन होतं. नुकतेच १७ नोव्हेंबरला ९४ व्या वर्षी त्यांचं निधन झाल्याची बातमी आली आणि त्यांचं जीवन, वाङ्मयीन कर्तृत्व यांच्या आठवणी ताज्या झाल्या. त्यातही त्याचं स्त्रीविषयक भान अधिक तीव्रतेनं सामोरं आलं.

डोरिस लेसिंग यांचं वाङ्मयविश्व अतिशय समृद्ध आहे. आपल्या सर्जनशील लेखनातून स्त्री–पुरुष व्यक्तिरेखांचे भिन्न भिन्न नमुने त्यांनी वाचकांपुढे ठेवले. त्या व्यक्तिरेखांच्या जीवनचित्रणातून स्त्री–पुरुष संबंध स्त्रियांचे भावविश्व, त्यांच्या अंतर्मनात दडपल्या गेलेल्या भावना, वासना यांचे चित्रण त्यांनी केले. त्याचबरोबर आधुनिक काळात व्यक्तीच्या मनावर येणारे विविध प्रकारचे ताण आणि त्यांचे गुंतागुंतीचं आयुष्य याचे वास्तवचित्रण त्यांनी आपल्या साहित्यातून केले.

लेसिंग यांची पहिली कादंबरी 'द ग्रास इज सिंगिंग' त्यांच्या तिशीत प्रकाशित झाली.

**– संकलित**

निन्दा किसी की न करूं, निन्दा किसी की न सुनूं,
वरदान दे मुझको प्रभु, करने से सुनने बचूं।।
निन्दा बढावे अहम् को, मन को करे है मलिन वह है
दे डुबोय जन को वह, तेरे भजन ही मन धरूं।।
पर जो करें निन्दा मेरी, आभार उसका मान लूं
करता वह निर्मल मन मेरा,
बातों को उसकी मैं सुनूं।।
सुनना सुनाना पाप है, पर सहन करना साधना,
निन्दा रहूँ सहता सदा, मन में मैं निर्मलता भरूं।।
शिवोम् मन निर्मल यह ही, तुम रीझते तुम मानते,
तुझ को मना लूं हे प्रभु, नही करूं ना ही सुनूं।।

**– श्री गुरुमहाराज**

●●●

# श्रीमत् भगवद् गीता - अध्याय दहावा
## विषय : विभूति योग

*कै. शंकरराव मठांनी दिशासाठी दिलेल्या लेखमालेतील हा १० व्या अध्यायावरील लेख. या लेखाच्या माध्यमातून कै. मठांना आम्ही विनम्र अभिवादन करतो. - संपादक*

**श्लोक १ ते ७ भगवंताच्या विभूती व योग शक्ती जाणण्यापासून फायदे**

श्रीकृष्ण म्हणतो–अर्जुना, मी आणखी एक महत्वाचे सांगतो ते ऐक. तुला संतोष व्हावा यासाठी व तुझ्या हितासाठी ही गोष्ट तुला मी सांगत आहे. देवगण व महर्षींना देखील माझ्या उत्पत्तीचे ज्ञान नाही. कारण देव आणि महर्षी यांचे सर्व प्रकारे मीच आदि कारण आहे. जो मला अजन्मा, अनादि आणि सर्व लोकांचा अधिपति असे समजतो, तो मर्त्य लोकात मोह विरहित ज्ञानी होऊन सर्व पापांपासून मुक्त होतो.

बुद्धी, ज्ञान, शहाणपणा, क्षमा, सत्य, इंद्रिय निग्रह, मनःशान्ति, सुख दुःख उत्पत्ती, विनाश भय, अभय, अहिंसा, समता, संतोष, तप, दान, यश, अपयश हे भिन्न प्रकारच्या प्राण्यांत उत्पन्न होणारे अनेक भाव ईश्वरापासूनच उत्पन्न होतात. पूर्व कालीन सात ऋषि आणि चार मनु हे ईश्वराच्या मनापासून उत्पन्न झालेले भाव आहेत. ज्यांच्यापासून या लोकी यासर्व प्राण्यांची उत्पत्ती झाली आहे. जो ईश्वराच्या विभूतीला आणि रचनेच्या कौशल्यपूर्ण शक्तीला यथार्थपणे जाणतो तो अविचलित योगाने युक्त होतो यात संशय नाही.

**श्लोक ८ ते ११ फळ व प्रभावसहित भक्तियोग कथन**

ईश्वर सर्वांचा उत्पन्न कर्ता आहे. ईश्वरापासूनच सर्व काही उत्पन्न होते. हे ओळखून ज्ञानी लोक श्रद्धेने ईश्वराचे भजन करतात. ते ईश्वराच्या ठिकाणी चित्त ठेवून त्याला प्राण सुद्धा समर्पण करून एकमेकांना बोध करीत, व त्याचे वर्णन करीत नेहमी संतुष्ट, आनंदित असतात. अशाप्रकारे सतत हा योग करणाऱ्यांना आणि प्रेमपूर्वक ईश्वराचे भजन करणाऱ्याना मी बुद्धि योग देतो. ज्यामुळे ते ईश्वराच्याजवळ जातात. त्यांच्यावर दया करण्यासाठी ईश्वर त्यांच्या आत्म्याच्या भावात राहून प्रकाशमय ज्ञानदीपाने त्यांचा अज्ञानजन्य अधिकार नाहीसा करतो.

**श्लोक १२ ते १८ अर्जुन भगवंताची स्तुती करतो व विभूतीविषयी सांगण्याबद्दल विनवितो.**

अर्जुन म्हणतो–कृष्णा तू परब्रह्म, परम स्थान आणि परम पवित्र आहेस. सर्व ऋषि तुला शाश्वत दिव्य, आदिदेव, अजन्मा, विभू आणि उत्तम पुरुष म्हणत आले आहेत. तसेच देवर्षि नारद असित देव आणि व्यासही म्हणतात आणि स्वतः तू जो सांगतोस ते ही असेच आहे. हे केशवा तू मला जे सांगतोस ते सर्व मी सत्य मानतो. हे भगवंता देव अथवा दानव तुझे स्वरूप जाणत नाहीत. हे पुरुषोत्तमा, भूतांचे उत्पादक, भूतांचे ईश्वर, देवाधिदेव आणि जगत् जते, स्वतःच तू तुला जाणतोस म्हणून ज्या विभूतीनी तू हे लोक व्यापून राहिला आहेस. त्या तुझ्या दिव्य विभूतीचे वर्णन मला पूर्णपणे सांग. हे योगिन् नित्य तुझे चिंतन करीत मी तुला कसे ओळखू शकेन. हे भगवान् कोणकोणत्या भावात मी तुझे चिंतन करावे? हे जनार्दना तुझ्या कौशल्य योगाचे आणि विभूतीचे पुनः मला विस्तृत वर्णन करून सांग. हे अमृतरूप वर्णन ऐकून माझी तृप्ती होत नाही.

**श्लोक १९ ते ४२ विभूति व योग शक्तीबद्दल कथन.**

श्रीकृष्ण म्हणतो–अर्जुना आता मी माझ्या मुख्य मुख्य विभूती तुला सांगतो. कारण त्यांच्या विस्ताराला

अंतच नाही. हे गुडाकेशा – मी सर्व प्राण्यांच्या ठिकाणी राहणारा आत्मा आहे. भूतांचा आदि मध्य अंतही मीच आहे. आदिव्यात विष्णु मी, ज्यांतीत चमकणारा सूर्य मी, मरुतात मरीची आणि नक्षत्रात चंद्र मी आहे. वेदांत सामवेद मी, देवात इंद्र मी, इंद्रियांत मन, प्राण्यात चेतना मी आहे. रुद्रात शंकर, यक्ष आणि राक्षसात कुबेर मी वसूमध्ये अग्नि मी, पर्वतात मेरू पवर्त मी आहे. हे पार्थ, तू मला पुरोहितात मुख्य बृहस्ती समज, सेनापतीत स्कंद, आणि जलाशयात सागर मी आहे. मध्यर्षीपैकी भृगु वाणीत एकाक्षर मी आहे. यज्ञात जपयज्ञ आणि स्यावरात हिमालय मी आहे. सर्व वृक्षामध्ये अश्वत्व, देवर्षीत नारद, गंधर्वात चित्ररथ आणि सिद्धापैकी कपिलमुनि मी आहे. अमृतापासून उत्पन्न झालेला उचैश्रवा घोडा मी, हत्तीत ऐरावत आणि मनुष्यात राजा मी आहे. हत्यारात वज्र मी, शार्हत कामधेनु, प्रजा उत्पन्न करणारा काम मी आणि सर्वात वासुकी मी आहे. नागात अनंत नाग मी आणि जलचरात वरुण मी आहे. पितरात अर्यमा आणि नियमन करणाऱ्यात यम मी आहे. त्यात प्रल्हाद आणि गणना करणाऱ्यात काल, पशूत सिंह आणि पक्ष्यात गरुड मी आहे. पावन करणाऱ्यात वायु मी आहे. शस्त्रधाऱ्यात राम मी आहे. माशात मगर आणि नद्यात गंगा नदी मी आहे.

हे अर्जुना, सृष्टिमात्राच्या आदिमध्यांत मी आहे. विद्येपैकी अध्यात्मविद्या आणि वाद करणाऱ्यांचा वाद मी आहे. अक्षरापैकी अकार, समासात द्वंद्व, अक्षयकाळ आणि सर्वतो मुखी सर्वांचा आधार मी आहे. सर्वांचा संहार करणारा मृत्यू मी आणि भविष्यकाळी उत्पन्न होणाऱ्यांच्या उत्पत्तीचे कारण मी आहे. स्त्रियांपैकी कीर्ति, लक्ष्मी, वाणी, स्मृती, मेधा, धृती आणि क्षमा मी आहे. सामात बृहत्नामक साम व छंदात गायत्री छंद मी आहे. मासात मार्गशीर्ष आणि ऋतुत वसंत मी आहे. छळ करणाऱ्यांचे द्यूत, तेजस्वांचे तेज, जप निश्चय मी आहे आणि सत्वशीलांचे सत्व मी आहे. यादवांपैकी वासुदेव आणि पांडवात अर्जुन मी आहे. मुनीपैकी व्यास आणि कवीमध्ये शुक्राचार्य मी आहे. शासन करणाऱ्यांचा दंड मी आहे. विजयेत्तुची नीति, गुह्य गोष्टीतील मौन आणि ज्ञानाचे ज्ञान मी आहे. हे अर्जुना सर्व भूतांचे जे काही बीज आहे ते मीच आहे. माझ्यावाचून स्थावर जंगम अशी कोणतीही वस्तू नाही. हे परंतपा माझ्या दिव्य विभूतीना अन्त नाही. विभूतींचा हा विस्तार मी केवळ दिक्‌दर्शनार्थ सांगितला आहे.

जी जी वस्तू वैभवयुक्त आणि प्रभावयुक्त आहे, ती सर्व माझ्या तेजाच्या अंशापासून उत्पन्न झाली आहे असे तू समज. हे अर्जुना तुला इतका विस्तार जाणून काय लाभ होणार? मी हे सारे जगत् आपल्या एका अंशाने व्यापून राहिलो आहे असे समज.

गीतेच्या या अध्यायाचे नाव विभूतियोग असे आहे. विभूति म्हणजे ऐश्वर्य व योग म्हणजे कुशलता विभूति योग याचा अर्थ, ऐश्वर्य, शोभा आणि प्रभाव प्रकट करण्याचे कौशल्यमय ईश्वरीय सामर्थ्य. हे सामर्थ्य प्रगट रीतीने कुठेकुठे दिसून येते याचा विचार या अध्यायात केलेला आहे.

साधक परमेश्वराचे ध्यान करून इच्छित असला तरी त्याने कोठे व कशा रूपातले ध्यान करावे, कारण परमात्मा सर्व व्यापक आहे. तो दिव्य दृष्टीने पाहिला पाहिजे. ही दिव्य दृष्टी सर्वांनाच प्राप्त होत नाही. मग अशानी काय करावे याचे उत्तर या विभूति योगाने दिले आहे. अगदी प्रथमावस्थेत विश्वरूपात तयाचा साक्षात्कार होईपर्यंत त्याची ऐश्वर्याची स्थळे पाहणे आणि त्याचे ध्यान करणे हे सर्वांना शक्य होणारे आहे. ज्या ठिकाणी विशेष ऐश्वर्य, विशेष शोभा आणि विशेष प्रभाव अनुभवास येतो तिथे ईश्वरला पाहावे. तीच त्याची विभूति होय. त्या विभूतीची उपासना केल्यास परमेश्वराची उपासना होते. साधकाने अशा कोणत्याही विभूतिची उपासना करावी आणि ईश्वरीय साक्षात्काराचा अनुभव घ्यावा.

**मूर्तिपूजा** – यातूनच मूर्तिपूजेचे तत्त्व उदयाला आले आहे.

यामुळेच रामकृष्ण आदी आपल्या ध्यानाचे व उपासनेचे विषय बनले आहेत. तसेच अनेक वीर, अनेक तत्त्वज्ञानी, अनेक संत महंत, अनेक विद्वान विभूती झाल्या असून त्यांना भारतीय सांस्कृतिक जीवनात फार मोठे श्रद्धेचे व पूजनीय स्थान प्राप्त झालेले आहे. हिंदुधर्मात मूर्तिपूजा प्रचलित आहे. त्याचे मूळ या विभूती पुजेत आणि वीर पुजेत आहे. ज्या ठिकाणी ऐश्वर्य शोभा आणि प्रभाव विशेष आहे ती विभूती पूजनीय मानली गेली आहे. या विभूतीने जनतेचे शत्रू दूर करून त्याना सुखी केले आणि प्रभाव प्रकट केला असे अनेक ऐतिहासिक पुरुष होऊन गेले. त्यांनी आपल्या जीवनात कोणते सर्वजनासाठी कल्याणकारक कार्य केले हे समजून घेतले पाहिजे.

इतकेच काय, गाय, पिंपळ, वड, नदी, समुद्र, पर्वत, यांच्या ठिकाणी विशेषत्व आढळत असल्याने यांनाही विभूती महत्त्व प्राप्त झाले आहे. पूजा कोणत्या पद्धतीने करावी हा प्रश्न स्वतंत्र आहे, पण या गोष्टीबद्दल आपल्याला निश्चितपणे आदर आहे ही गोष्ट स्पष्ट आहे.

परमेश्वर आपल्या एका अंशाने (एकांशेन स्थितो जगत्) या विश्वाला व्यापून राहिला आहे. सर्व सात्विक राजस, तामस भाव त्याच्या पासूनच झाले आहेत. सर्व भूतांच्या ठिकाणी ईश्वरच आत्मरूपात राहतो. परमेश्वराचा संबंध नाही अशी एकही वस्तू नाही. प्रत्येक वस्तूत ईश्वराचा भाव (अस्तित्व) आहे. तो जिथे विशेषरूपाने आहे, त्याची विशेषता दाखविण्यासाठी वानगीदाखल विशेष काही स्थाने (विभूतिमत्व) या अध्यायात सांगितले आहेत.

या अध्यायात एकूण ७६ विभूती गणलेल्या आहेत. वास्तविक प्रत्येक वस्तूच ईश्वराची विभूती आहे आणि हाच भाव ईश्वर एका अंशाने सर्व जग व्यापून राहिला आहे. या वचनात सांगितला आहे. इथे वर्णन केलेल्या विभूतींची वर्गवारी पुढीलप्रमाणे आहे.

१) **क्षत्रिय विभूती –** रामःशस्त्र भृतां अहम् (१०.३१) वृष्णीनां वासुदेवो ऽ स्ति (१०.३७) पाण्डवानां धनंजय (१०.३७) नराणाच नराधिपः(१०.२७) सर्पाणां अस्मि वासुर्तकः (१०.२८) अनन्तश्वास्मि नागानां (१०.२९) प्रल्हादश्वास्मि दैत्यानाम्(१०.३०)

२) **स्त्री विभूती–किर्तीः–** दक्ष प्रजापति कन्या, प्रियव्रत राजाची ज्येष्ठ पत्नी अत्यंत धर्मशील.

**श्रीः –** भृगु आणि ख्याती यांची कन्या, हिचे लग्न विष्णूशी झाले. लक्ष्मी (श्री नारायण ही जोडी आदर्श गृहस्थांचा नमुना मानली जाते.

**वाक् –** आंभृण ऋषीची कन्या (ऋ.१०.१२५ व्या सूक्ताची द्रष्टी) ऋचिका श्रेष्ठ कन्या तेजस्वी विचाराची स्त्री.

**स्मृतिः दक्षकन्या –** आंगिरस ऋषीची धर्मपत्नी.

**धृतिः** धर्मऋषी मनु नामक एका रुद्राची स्त्री.

**मेधा –** दक्ष कन्या धर्माची पत्नी.

**क्षमा –** दक्षकन्या पूलद ऋषीची स्त्री. वरील सर्व स्त्रियांची वर्णने पुराणांतही आढळतात. या स्त्रिया पुराणकालीन आहेत. आर्यांच्या ऐतिहासिक काळात अनेक श्रेष्ठ स्त्रिया झालेल्या आहेत.

**कीर्तीः** श्रीः वाक्च वारीणां स्मृतिः मेधा धृतिः क्षमा – गीता १०.३४

३) **ब्राह्मण विभूती –** पुरोधसां मुख्यं बृहस्पतिम् (१०.२४) देवर्षोणां नारदः (१०.२६) कवीनां उशना कविः (१०.३०) महर्षीणां भृगुः (१०.२६) सिद्धानां कपिलामुनिः (१०.२६) मुनीनांव्यासः (१०.३७)

४) **देवताविभूती –** देवानां वासवः (१०.२२) धाता ऽर्ह विश्वातो मुखः (१०.३३) आदित्यानां विष्णुः (१०.२९) ज्योतिषांसा रविरंशुमान् (१०.२२) रुद्राणां शंकरः (१०.२३) पवनः पवतां (१०.३१) मरीचिःमरुतां

(१०.२१) वरुणो याद (१०.२९) सेनानीनां स्कन्दः (१०.२४) वसूनां पावकः (१०.२३) नक्षत्रातां अहंशशी (१०.२१) प्रजनःअस्मि कंदर्पः।

५) **पितर विभूती –** पिसॄणां अर्यमश्वास्मि।१०.२९

६) **यक्ष राक्षस विभूती –** बित्तेशो यक्षरक्षसाम् (१०.२३)

७) **गंधर्व विभूती–** गंधर्वाणां चित्ररथः (१०.२६)

८) **गुर्णाजन गुण विभूती –** ज्ञानं ज्ञानवताम् (१०.३८) वादःप्रवदतां (१०.३२) मौनं चैवस्मिगुह्यानाम् (१०.३८) दण्डो दमयितां (१०.३८) तेजः तेजस्विनां (१०.३६) सत्वं सत्ववतां (१०.३६) नीतिः जिगीषताम् (१०.३८) जपोस्मि (१०.३६) व्यवसायोऽस्पि (१०.३६) द्यूतं छलयतां (१०.३६)

९) **विद्येतील विभूती –** अध्यात्म विद्या विद्यानाम् (१०.३५) गायत्री छंदसामहं (१०.३५) द्वंद्व सामासिकस्मच (१०.३३) यज्ञानां तप यज्ञोऽस्मि।१०.२५

१०) **पशुपक्षी विभूती –** धेनूनांअस्मिकामधुक् (१०.२८) उक्वैश्रवसंअश्वानां (१०.२२) ऐरावतं गजेद्राणां (१०.२०) मृगाणांच मृगेन्दोऽहं।१०.३०, वैनतेयः पक्षिणां (१०.३०) झषाणां मकरः (१०.३१)

११) **स्थावर विभूती –** मेरुः शिश्वरिणाम् (१०.२३) स्थावराणां हिमालयः (१०.२५) अश्वत्थः सर्ववृक्षाणः (१०.२६)

१२) **जल विभूती –** सरसां अस्मि सागरः (१०.२४) स्त्रोतसांअस्ति जान्हवी (१०.३१)

१३) **इंद्रिय विभूती –** इंदियाणां मनः (१०.२२)

१४) **शस्त्रातील विभूती –** आयुधानां अहंब्रज्रम्ः (१०.२८)

१५) **जन्म मृत्यु विभूती –** उबद्भवश्च भविष्यताम् (१०.३४) मृत्युः सर्व हरश्चाहं (१०.३४) यमः संयतामहं (१०.२)

१६) **काल विभूती** : अहमेव अक्षयः कालः (१०.३१) कालः कलयतामहं (१०.३०) मासानां मार्गशीर्षोऽहमे् (१०.३५) ऋतूनां कुसुमाकरः (१०.३५)

१७) **बीज व विस्तार –** यश्त् चापि सर्वभूतानां बीजं तत् अहमर्जुन (१०.३०) सगीणां आदिरन्तश्च मदपं चैवाहमर्जुन।(१०.३२) भूतानां अस्मिचेतना (१०.२२)

एकूण १७ विभाग एकूण ७६ विभूतींचा उल्लेख केलेला आहे.

क्षत्रिय ७, स्त्री ७, ब्राह्मण ६, देव–१२, पितर–१, यक्षराक्षस १, गंधर्व–१, गुणरुप–१०, विद्या–८, पशुपक्षी–६, स्थावर–३, जल–२, इंद्रिय–१, शस्त्र–१, जन्ममृत्यू–३, काल–४, बीज व विस्तार–३, परमेश्वराची विभूति कोठे ओळखावी, कोठं नाही, या विषयीची तीन लक्षणे–

१) ज्या ठिकाणी विशेषत्वाने ऐश्वर्य आहे – यत् यत् विभूतिमत् सत्वम्।

२) जेथे श्री – शोभा – सौंदर्य आहे – श्रीमत् अर्जितमेव वा

३) ज्या ठिकाणी विशेष तेज व बल आहे – तत् तत् मम तेजोंश संभवम्।

विभूति मनुष्यात असो, स्थावरात असो, आपल्या देशात वा देशांतरात असो तेथे या गोष्टी आहेत की नाहीत याची परीक्षा करण्याच्या वरीलप्रमाणे तीन कसोट्या सांगितलेल्या आहेत. छळ, कपट, घातक शस्त्रे, ही सुद्धा ईश्वरापासून होतात. त्यातील परमावधि ही विभूति मानली गेली आहे.

अध्याय ७,९ आणि १० ही सारखीच मानावी लागतील. या सर्व अध्यायातून सृष्टी प्रारंभ व परमात्म स्वरुपाची स्थाने विशेषत्वाने सांगितली आहेत. ही सर्वभूत मात्रे माझ्यात आहेत मी मात्र त्याच्यांत नाही. मीच सर्वात बीजरुपाने आहे व मी मात्र त्यांच्यात नाही. याचे प्रात्यक्षिक ११ व्य अध्यायात विश्वरुप दर्शनाने घडविले आहे.

**विशेष माहिती**

१२ आदित्य – आदित्यानां अहे विष्णुः धाता, मित्र, अर्यमा, शक्र, वरुण, सूर्य एकच। भगो विवस्वाम् पूषा च सविता दशमः स्मृतः। एकादशः तथात्वष्टा विष्णुः द्वादश उच्यते। (म.भा.१–६५)

सप्तऋषिः – भृगु मरीचि, अत्रि, पुलह, पुलसप ऋतु आणि वसिष्ठ.

पहिले चार मनु – स्वायंभुव, स्वारोचिप, उत्तम, तामस

सप्तऋषि आणि चार मनु यांचा जन्म ब्रह्माच्या मानसिक शक्तीने झाला. मानसाः ज्ञाताः। यांच्यापासून सर्व प्रजा निर्माण झाली हे मानस पुत्र म्हणजे वगवेगळ्या शक्तीचे अविष्कार अगर मूळ कार्यकारी शक्ती असा घ्यावा लागेल. तरच यांच्यापासून व्यक्त सृष्टी, प्रजा, पदार्थ इत्यादि, उत्पन्न झाले असे ध्यानात येईल. परमात्म्याची एकच शक्ती या विविध माध्यामातून अभिव्यक्त होऊन सृष्टीचे स्वरुप धारण करीत असते. हे ध्यानात आल्यास प्रत्येक वस्तु ही परमात्म्यात जोडलेली आहे. हे निःशंकपणे मानता येते. यालाच अविकंप योग असे गीतेत म्हटले आहे.

अकरा रुद्र – नावाबद्दल मतभेद – पुढील नावे सर्वसामान्यपणे मान्य. हर, त्र्यंबक, पिनाकी, अपराति कपर्दी शंभु, रैवत, शर्व, कपाली, गिरीश, शंकर.

आठ वसु – धर, प्रत्युष, अनल(अग्नि) अनिल (वायु) ध्रुव, सोम, अहः, प्रभास

मेरु : म्हणजे ध्रुव– यांच्याभोवती सर्व विश्व प्रदक्षिणा घालते. आपल्या मज्जादंडाला मेरुदंड असे म्हणतात. तिथे सुषुम्ना नाडी असल्याने सर्व चैतन्यमयता, प्रकाशमयता, संवेदन क्षमता, मनुष्याला प्राप्त होते.

असित – कश्यप मुनीचा मुलगा हा ब्रह्मवेत्ता. देवल हा असित पुत्र, हे उभयता पिता पुत्र ऋग्वेद मंत्रद्रष्टे ऋषी आहेत. भगवान शंकराची आराधना करून यानी सिद्धि प्राप्त करून घेतली.

व्यास – मूळ नाव द्वैपायन, वर्णाने काळे म्हणून कृष्ण द्वैपायन, अष्टादश पुराणानां कर्ता सलवती सुद वेदाचे भाग केल्याने त्याना व्यास हे नाव पडले. विव्यास चतुरोवेदान् तस्मात् व्यास शति स्मृतः।

बुद्धियोग – परमेश्वराचे ऐश्वर्य साधकाच्या मनात उदित होते व तो परमात्म स्वरुपाकडे विशेषत्वा खेचला जातो आणि त्याची साधना अधिक तीव्र होत जाते, हे असे होता होता परमात्म ज्ञान त्याला अधिक स्पष्ट होत जाते आणि त्याच्या ठिकाणचे अज्ञान विरावयास लागते. यानंतर परमात्म्याच्या स्वरुपाची जाणीव तीव्र तर होत जाते त्यातून निर्माण होत असलेली अवीट गोडी तो अनुभवू लागतो. यानंतर तो परमात्म्याला पूर्ण शरण जातो आणि त्या ओढीमुळे परमतत्वाशी निगडित होत जातो. त्या प्रमाणात त्याच्यावर परमात्म कृपा होत जाते. पुढे परमात्माच त्याला मदत करतो म्हणून मीच त्याला बुद्धियोग देतो असे म्हटले आहे.

सर्वभूजाशय स्थितः – मी सर्वांच्या हृदयात ठाण मांडून राहतो.

**कै. शं. बा. मठ**

●●●

दिशा
नियमित वाचा.
आपली मते जाणून घेण्यास आम्ही उत्सुक आहोत.

मन स्वतःच प्रकाश देते अशा मनाला अनुभवाची गरज नसते.

# ''उंच माझा झोका''

*झीच्या मराठी वाहिनीवर सादर करण्यात आल्या ''उंच माझा झोका'' यावरील हा त्रोटक पण विश्लेषणात्मक लेख. चांगला मालिकांचा अभ्यास करून प्रेक्षक आपला व्यासंग वाढवू शकतात. - संपादक*

मराठीतील बहुचर्चित आणि प्रेक्षकप्रिय ठरलेली ''उंच माझा झोका'' ही रमाबाई रानड्यांच्या जीवनावरील मालिका संपली, पण आठवणीत रेंगाळत राहिली. दूरदर्शनवरील मालिका म्हटल्यावर येणाऱ्या अनेक मर्यादांतून वाटचाल करत मालिका पुढे गेली. मात्र १९२५ पर्यंतच्या महाराष्ट्रातील काही ऐतिहासिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, सामाजिक संदर्भ केवळ उल्लेख करत स्थूलमानाने दाखवले गेले. बरीचशी मालिका माधवराव रानडे व रमाबाईंचे अन्य कुटुंबीय यांच्या भोवती फिरत राहिली. ताई काकू, सुभद्राकाकू इत्यादी पात्रांच्या संदर्भात इतिहासाचा तपशील बाजूला ठेवत




**माधवराव व रमाबाई**

मालिका सिनेमॅटिक करण्यात आली. मालिका प्रेक्षकांना आवडावी, यासाठी कथानकात चित्रपट तंत्राची अशी वळणे बऱ्याच ठिकाणी आली. त्यामुळे सुमारे ८०% मालिका मनोरंजक करण्याकडे दिग्दर्शकाचा कल राहिला. 'आमच्या जीवनातील आठवणी' व न. र. फाटक यांनी लिहिलेले चरित्रात्मक पुस्तक हा यातील कथानकाचा मुळ धागा होता. त्यामुळे माधवरावांच्या संदर्भात उल्लेख येणे हे केवळ अपरिहार्य होते. परंतु रमाबाई व माधवराव यांच्यातील प्रेमप्रसंग, माधवरावांना देण्यात आलेले महत्त्व अशा काही बाबींमुळे मालिका रमाबाई रानडे यांच्यावरील न रहाता रमा माधव व रानडे वाडा यांच्या भोवती फिरत राहिली.

असे असले, तरी सशक्त व्यक्तिचित्रण हे या मालिकेचे वैशिष्ट्य होते. काही व्यक्ती केवळ उल्लेख करून मालिकेमधून मधेच वगळण्यात आल्या. (उदा. माधवरावांची विधवा बहीण) तर सुभद्रा काकूसारख्या व्यक्तिमत्त्वाचा ठळकपणे येत राहिलेला उल्लेख अनावश्यक वाटला. माधवरावांचे इंग्रजी मित्रमंडळ, त्यातील रमाबाईंचा वावर काही ठिकाणी योग्य तर काही ठिकाणी खटकणारा ठिगळ लावल्यासारखा ठरत होता.




**ताईकाकू व सुभद्राकाकू**

मालिका म्हटल्यावर येणारे स्थळाचे बंधन हे पैशांमुळे असू शकते. त्यामुळे बरेचसे उल्लेख हे रानडे वाड्यांमधील व्यक्तींच्या आपापसातील बोलण्यातून येत रहातात. बाह्य चित्रण टाळण्यात आले. नको असलेल्या रटाळ आणि

कंटाळवाण्या मालिकांमध्ये हे बाह्य चित्रण हा त्यांचा एक आकर्षणाचा एक भाग असतो. पण वर म्हटल्याप्रमाणे खर्चावरील बंधन किंवा वेळेचे बंधन यामुळे असे काही संदर्भ केवळ स्पर्श करत गेल्यासारखे दाखवले गेले.

तरीसुद्धा १९ व्या शतकाच्या संदर्भातील मराठी माणसात बोलली जाणारी मराठी भाषा, वेशभूषा, चालीरीतींमधील तपशील हे या मालिकेचे आकर्षण बिंदू ठरले. प्रत्येक व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाच्या संदर्भात कथानकाचा अभ्यास विषय म्हणून शक्य आहे.




**मालिकेतील सेटवरील एक दृश्य**

विशेषतः त्या काळातील पुणे परीसरातील सर्व महत्त्वाचे राजकीय व सामाजिक संबंध दाखवण्याचा प्रयत्न हा मराठी मालिकेत अभावाने पहायला मिळतो. यापूर्वी येऊन गेलेल्या स्वामी या मालिकेत तसे काही उल्लेख होते; पण या मालिकेमध्ये दाखवण्यात आलेले सार्वाजनिक काका, भांडारकर, गोखले इत्यादी व्यक्ती महत्त्वाच्या होत्या. महात्मा फुल्यांच्या कार्याचा उल्लेख, आण्णासाहेब कर्वे, रघुनाथराव कर्वे यांची घेतलेली दखल, महात्मा गांधी व टिळक यांची रमाबाईंशी झालेली भेट इत्यादी गोष्टी आवर्जून दखल घ्याव्यात अशा होत्या.

माधवरावांनंतर तेवीस वर्षे रमाबाईंनी भरीव कार्य केले. माधवरावांची रमाबाईंना येणारी आठवण व तेवीस वर्षे त्यांच्या छायाचित्राला महत्त्व देत रहाणे, हे खटकणारे होते. आठवणींचे असे प्रदर्शन हा चित्रपटांच्या तंत्राचा प्रभाव होता.




**माधवरावांच्या मृत्यूनंतर**

जेवणावळींना दिले गेलेले आणि स्वयंपाकघराला दिले गेलेले अवास्तव महत्त्व हे देखील काही भागांमध्ये खटकणारे होते. येणाऱ्या पाहुण्याला दिल्या जाणाऱ्या फराळाचा उल्लेख हा रीतीरिवाज दाखवण्याचा चांगला प्रयत्न वाटला.

१८५० ते १९४७ या कालखंडातील मराठी जीवनातील महत्त्वाच्या व्यक्तिरेखांवर अशाप्रकारे मालिका तयार करणे हे खर्चाच्या दृष्टीने अतिशय अवघड काम आहे. मालिका म्हटल्यावर येणारी अनेक बंधने (उदा. पैसा, वेळ, ठिकाणे दाखवण्यावरील मर्यादा, जाहिराती व टीआरपीचा विचार) नजरे आड करून चालणार नाहीत. तसेच सिनेमॅटिक तपशीलाचा विचार बाजूला ठेवला; तर मालिका रुक्ष होईल हे सत्यही दृष्टिआड करता येत नाही. या पार्श्वभूमीवर अनेक व्यक्तिरेखा अशा आहेत की त्यांचे मालिका स्वरूपातील असे प्रक्षेपण, पात्रांचे व्यक्तिचित्रण तरुण पिढीच्या दृष्टीने उपयुक्त ठरेल असा भाग आहे. त्या दृष्टीने 'उंच माझा झोका' ही मालिका मराठी मालिकांमधील एक मैलाचा दगड ठरेल अशी होती, त्यात वाद नाही.

**– मोहन पाठक**

●●●

# नर्मदा परिक्रमा

**भाग : १**

*नर्मदा परिक्रमा हे एक आव्हान असते. आमचे स्नेही श्री. अरविंद ओक व सौ./श्री. वझे यांनी या परिक्रमेचा अनुभव घेतला. या परिक्रमेतील अनुभव, निरीक्षणे व चिंतन यावर आधारित लेखमालेतील हा महिला लेख. - संपादक*

समुद्रातून, वाळूतून, पाण्यातून, धूळमातीतून, दाट जंगलातून, उजाड माळरानातून, डांबर सडकेवरुन, आर.सी.सी.रस्त्यांवरून, शेतांमधून, नदीकाठाने, अगदी छोट्या-छोट्या खेड्यांपासून ते प्रसिद्ध शहरांमधून, अगदी जागतिक कीर्ति मिळविलेला असा एकमेवाद्वितीय प्रदीर्घ प्रवास तोही अंदाजे २८०० किलो मीटर इतक्या अंतराचा. आम्ही कशाबद्दल निवेदन करीत आहोत हे आपल्या लक्षात आले असेलच. अर्थातच माँ नर्मदा म्हणजेच नर्मदा मैय्याची परिक्रमा. भारतातच नव्हे तर साता समुद्रापार संपूर्ण जगात परिक्रमेचा मान मिळविलेली एकमेव नदी. जिच्या परिक्रमेला आध्यात्मिक धार्मिक दृष्ट्या जगन्मान्यता तर आहेच. एवढेच नव्हे तर नर्मदा परिक्रमा केलेल्या प्रत्येक व्यक्तीला समाजात एक आदरणीय स्थान ही प्राप्त होते. याबाबतचे आम्हा उभयतांचे विचार आपल्यापर्यंत पोहचावेत व नर्मदा परिक्रमेबद्दलची जागरुकता आपल्या मनात पुन्हा जागवावी एवढाच माफक उद्देश आमच्या निवेदनात आहे.




नर्मदा परिक्रमेची भौगोलिक परिस्थिती, धार्मिक व पौराणिक महत्त्व, सामाजिक व शैक्षणिक स्थिती, शेती-सरकार-निसर्ग व नर्मदा मैय्या बद्दल स्थानिक लोकांची मतं या विषयीची माहिती आमच्या १२८ दिवसांच्या प्रवासात जाणून घेण्याचा हा आमचा छोटासा प्रयत्न!

**भौगोलिक रचना**

आता आपण भौगोलिक रचना कशी आहे ते पाहू. मैय्या म्हणजेच नर्मदा मैय्या ही पश्चिमवाहिनी नदी आहे. पूर्वेकडे अमरकंटक येथे उगम पावून पश्चिमेला खंबायतच्या आखातात म्हणजे अरबी समुद्रात विलीन होते. हिची एकूण लांबी १०८० किलो मीटर आहे. या नदीला लहान-मोठे असे ९९९ प्रवाह येऊन मिळतात. या नदीवर बर्गी, पुनासा,ओंकारेश्वर लेपा व नर्मदा सरोवर अशी पाच मोठी धरणे आहेत. त्यामुळे अगदी नदी काठाने प्रवास करणे काही वेळा शक्य होत नाही. म्हणून नर्मदा परिक्रमा अंदाजे २८०० किलो मीटरची आहे. या परिक्रमेत एकूण चार राज्यांतून प्रवास करावा लागतो. नर्मदा मैय्याचा उगम अमरकंटक येथे, म्हणजे छत्तीसगड या राज्यात आहे. पुढे बराचसा भाग मध्यप्रदेशाचा आहे. थोडासा भाग महाराष्ट्रातील नंदुरबार जिल्ह्यात आहे. व शेवटी नदी अरबी समुद्रात जेथे विलीन होते तो भाग गुजरात राज्यात आहे. नर्मदा मैय्या पूर्वेकडून पश्चिमेकडे वाहत असल्यामुळे नदीच्या उत्तरेकडच्या प्रदेशाला उत्तरतट व दक्षिणेकडच्या प्रदेशाला दक्षिणतट असे संबोधले जाते. फार फार वर्षांपूर्वी उत्तरतट म्हणजे देवांचा तट किंवा देवांचा

धैर्याने पाऊल उचलले तर मग आपोआपच चालणे जमते.

निवास असे संबोधले जायचे व दक्षिणतट म्हणजे दैत्यभूमी असे संबोधायचे. आजही उत्तरतटाच्या तुलनेत दक्षिण तटावर खडकाळ व डोंगरदऱ्या असलेली भूमी जास्त आहे. त्यामुळे उत्तरतट अधिक सधन दिसून येतो.

**पुराणातील उल्लेख**

पुराणात नर्मदेविषयी काय सांगितले आहे, याबाबत थोडेसे पाहू या. समुद्रमंथन झाले त्यावेळी प्रथम विष बाहेर पडले. त्याचे काय करायचे? सर्वांनाच प्रश्न पडला. त्यावेळी भगवान शंकरांनी मी हे विष प्राशन करतोय असे म्हणून विष प्राशनाला सुरुवात केली. हे वृत्त माता पार्वतीला समजताच तिने स्व-तपोबलाच्या सामर्थ्यावर भगवान शंकरांच्या कंठाशीच हे विष थांबवले. कंठ काळा-निळा पडल्यामुळेच भगवान शंकरांना ''नीलकंठ'' असे संबोधले जाते. पार्वतीने स्व.तपोबलामुळे भगवान शंकरांच्या कंठाशीच हे विष थांबवले तरी त्याचा परिणाम म्हणून त्यांच्या देहाची आग आग व्हायला लागली. त्यांची ती अवस्था पाहून नर्मदेने म्हणजे त्यांच्या कन्येने पितापुत्रीच्या ओढीने भगवान शंकरांना कवटाळले. हळू हळू भगवान शंकरांचा दाह कमी होऊन ते पूर्वस्थितीवर आले. भगवान शंकरांनी आपल्या विषयीचा नर्मदेचा कळवळा पाहून तिला असा वर दिला की यापुढे माझ्या नावाअगोदर तुझे नाव घेतले जाईल म्हणजेच ''नर्मदे हर'' असे म्हटले जाईल व सर्व तेहतीस कोटी देव वर्षातून एकदा नर्मदेत स्नान करून पापमुक्त होतील. त्याचप्रमाणे सर्वसामान्यजन तुझ्या नुसत्या दर्शनाने ही पापमुक्त होऊन सुखी व समाधानी होतील. आजही गंगादशहरा या दिवशी स्वयम् गंगा नर्मदेमध्ये स्नानासाठी येते त्यावेळी उसळणारे पाणी पाहण्यासाठी लाखो भाविक नर्मदे किनारी येतात. नर्मदा परिक्रमेमध्ये आपण जेव्हा जेव्हा नर्मदेमध्ये स्नान करीत असतो त्यावेळी तेहतीस कोटी देवांपैकी कोणता ना कोणतातरी देव नर्मदेमध्ये स्नान करीत असतोच. त्यामुळे अदृश्य स्वरूपातील देवाचे स्नान चालू आहे याचा आभास नुसत्या नदीतील पाण्याच्या स्पर्शानेही जाणवतो. नर्मदेत स्नान करण्याचा आनंद काही वेगळाच आहे. प्रत्येकानेच तो जरूर अनुभवावा.

पहिली नर्मदा परिक्रमा कोणी केली? तूर्त यातील मतांतरे बाजूला ठेवून मार्कंडेय ऋषींनी केलेल्या नर्मदा परिक्रमेचा विचार करु. ही परिक्रमा पूर्ण करण्यासाठी त्याना २७ वर्षे लागली. या परिक्रमेचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी नर्मदेला येऊन मिळणारे ओढे, नद्या, नालेही ओलांडले नाहीत. या नर्मदेला येऊन मिळणाऱ्या ९९९ ओढे, नद्या, नाले यांच्या उगमापर्यंत जाऊन त्या ठिकाणी वळसा घेऊन त्यांनी परिक्रमा पूर्ण केली. परिक्रमेमध्ये ज्यावेळी मार्कंडेय ऋषी समुद्राशी आले त्यावेळी त्यांना प्रश्न पडला की आता परिक्रमा कशी करायची? त्यावेळी त्यांनी समुद्रदेवाला प्रार्थना केली व पुढील मार्गाविषयी मार्गदर्शन करण्याची विनंती केली. समुद्रदेवांनी त्यांना सांगितले की जगातली कोणतीही नदी माझ्यामध्ये विलीन होते त्यावेळी तिचे अस्तित्व संपते म्हणून तुम्ही माझ्या पाण्यातून प्रवास करून तुमची परिक्रमा पूर्ण करा. यावर मार्कंडेय ऋषींनी एक अडचण सांगितली की एवढे मोठे अंतर पोहून पार करणे निव्वळ अशक्य आहे. यावर काही उपाय आहे का? त्यावर समुद्रदेवांनी त्यांना सांगितले की हे अंतर तुम्ही मासेमारी करणाऱ्या कोळीबांधवांच्या मदतीने त्यांच्या होडीतून पार करा. हे कोळी बांधव नदीत व समुद्रात दोन्ही ठिकाणी मासेमारी करीत असतात. त्यावर मार्कंडेय ऋषींनी समुद्रदेवांना विचारले की आपण समुद्रात आहोत की नदीत आहोत हे ओळखायचे कसे? समुद्रदेव म्हणाले की ३०-४० फटांचा मोठा बांबू घ्या. ज्या ठिकाणी तो पूर्ण बुडेल त्या ठिकाणी नदीचे अस्तित्व संपून माझे अस्तित्व सुरु झालेले असेल. आजही नर्मदा परिक्रमेतील समुद्र प्रवासात हीच प्रथा अवलंबिली जाते. आजही समुद्रात होडी शिरताच नावाडी लांब बांबू पाण्यात संपूर्णपणे बुडत असल्याची खात्री नावेतील सर्वांना करुन देतो. त्यावेळी 'नर्मदेहर'चा जयजयकार होतो.

खणानारळाने ओटी भरून नर्मदेचे स्तवन व आरती केली जाते. पलिकडच्या तीरावर पोचल्यावर पुन्हा 'नर्मदेहर' चा जयजयकार हातो. ४.।। ते ५ तासांचा हा सुमारे अठ्ठावीस किलो मीटरचा प्रवास यांत्रिक होडीने पार करून परिक्रमावासी आनंदाने कृतकृत्य होतात.

**परिक्रमेची तयारी**

आता आपण नर्मदा परिक्रमेची पूर्व तयारी व परिक्रमेतील प्रमुख ठिकाणांबद्दल माहिती करून घेऊ. परिक्रमा सुरू करण्यापूर्वी माँ नर्मदेवर अपार श्रद्धा, पराकोटीचा दृढनिश्चय, स्वकीयांच्या शुभेच्छा, थोरामोठ्यांचे आशीर्वाद व पाठीवर अंदाजे ७ ते ७.५ किलो सामान वाहण्याची मानसिक तयारी असावीच लागते. पुरुषांसाठी एक रंगीत लुंगी व हातात खांद्या एवढ्या उंचीचा दंड जो आपल्या शरीराचा एक अविभाज्य भागच असतो, तो असावा लागतो. स्त्रियांसाठी पांढऱ्या रंगाची साडी किंवा पांढऱ्या रंगाचा पंजाबी सलवार कुर्ता असावा असा संकेत आहे की तुम्ही नर्मदा परिक्रमावासी म्हणून या पुढे ओळखले जाणार आहात. पूर्वी हातात कमंडलू किंवा स्टीलची कडी असलेला डबा ही पण नर्मदावासी म्हणून ओळखण्याची खूण होती. पण आम्ही त्या ऐवजी सॅकच्या दोन्ही कडेला दोन पाण्याच्या बाटल्या घेतलेल्या होत्या. एक हात मोकळा राहण्याच्या दृष्टीने आम्हाला ते खूपच सोईचे वाटले. या परिक्रमेच्या कालावधीबद्दल लिखित असे काहीही नाही. प्रत्येकाने आपल्या चालण्याच्या क्षमतेनुसार परिक्रमा पूर्ण करावयाची आहे. आपण परिक्रमा पूर्ण करण्यासाठी आलो आहोत हे सतत मनाला बजावत रहावे. वाटेत अनेक प्रकारे लोक विचारणा करीत असतात. त्यांनी विचारलेल्या प्रश्नांना शांत चित्ताने जमतील तशी उत्तरे द्यावीत. उगाचच वाद घालू नयेत. आपल्या परिक्रमेच्या निश्चयाशी आपण घट्ट चिकटून आहोत किंवा नाही याची एक सत्त्वपरीक्षाच पाहिली जाते. तीन वर्षे तीन महिने तेरा दिवस तेही अनवाणी म्हणजे खरी परिक्रमा असा कोठेही धर्मग्रंथात उल्लेख नाही. नर्मदा परिक्रमेचे पावित्र्य मी राखेन हेच शेवटी सत्य. काळमानारूप नर्मदा परिक्रमेचा कालावधी आपल्याला आनंद घेत सहज शक्य होईल तेवढा. फक्त पावसाळ्यात नर्मदेला येऊन मिळणाऱ्या ९९९ ओढे, प्रवाह, नाले, नद्या यांना भरपूर प्रमाणात पाणी असल्यामुळे ते ओलांडणे अवघड असते. या कालावधीत नर्मदा परिक्रमा करु नये हे चांगले. पावसाळ्यात स्थानिक लोकांची या प्रवाहातून, ओढ्यांतून, नाल्यांतून त्यांच्या कामकाजासाठी ये-जा चालू असते. त्यांना त्याची सवयही असते. आपण नवखे असतो. त्यामुळे तो धोका पत्करू नये.

परिक्रमा म्हणजे काय? परिक्रमा म्हणजे प्रदीर्घ प्रदक्षिणा. देवळात प्रदक्षिणा करताना आपण देव उजव्या हाताला ठेवून एक फेरी घेतो. त्याप्रमाणे नर्मदेला उजव्या हाताला ठेवून एक फेरी झाली की एक परिक्रमा पूर्ण झाली. महाराष्ट्रातून नर्मदा परिक्रमा करणारे बहुसंख्य लोक ओंकारेश्वर या बारा ज्योतिर्लिंगापैकी एक ज्योतिर्लिंग (जे नर्मदे किनारीच) आहे. येथून सुरुवात करून तेथेच पूर्ण करतात. नर्मदा किनारी रहाणारे लोक आपल्या गावातून परिक्रमेला सुरुवात करतात व परत आपल्या गावी जाऊन परिक्रमा पूर्ण करतात. परंतु परिक्रमा पूर्ण झाल्यावर श्रीक्षेत्र ओंकारेश्वर येथे येऊन तेथील शंकराच्या पिंडीवर अभिषेक केल्याशिवाय नर्मदा परिक्रमा पूर्ण केल्याचे पुण्य व समाधान त्यांना मिळत नाही. त्यामुळे नर्मदा मैय्याकाठचे रहिवासी ओंकारेश्वरचे महत्त्व व पावित्र्य राखताना दिसतात.

नर्मदा परिक्रमेचे पावित्र्य म्हणजे जसे आपण घर सोडून एखाद्या मित्राच्या घरी किंवा नातलगाच्या घरी जातो त्यावेळी काही अलिखित नियमांचे शिष्टाचार म्हणून पालन करतोच. उदा. चप्पल, बूट कुठे काढायचे? हातातील सामान कुठे ठेवायचे? कुठे बसायचे? हे सगळे ठरलेले असते त्याप्रमाणे नर्मदा परिक्रमा सुरु करण्यापूर्वी माझे चालणे, बोलणे, वागणे नित्य नेमाने करावयाचा दिनक्रम कसा असेल याबद्दल नर्मदा मैय्याकडे केलेला कबुलीनामा यालाच संकल्पविधी

अगोदर स्वतःच्या जीवनात परीवर्तन होणे महत्त्वाचे असते.

म्हणतात. या विधीमध्ये माँ नर्मदेची लहानशी प्रतिमा, श्री गणपतीचे प्रतिक म्हणून सुपारी, लक्ष्मीचे प्रतिक म्हणून एक नाणे, या सर्वांना आसन म्हणून एक रेशमी वस्त्र असावे लागते. खरंतरं रोज नर्मदा मैय्याचे दर्शन घेऊन तिच्या काठी पूजा करणे अपेक्षित आहे. परंतु नर्मदेवर धरणे झाल्यामुळे काही वेळा आपण नदीपासून खूपच दूर असतो. म्हणून नर्मदा जल एका बाटलीत घेऊन तिचे दर्शन घेऊन रोज पूजा केली जाते. त्याचबरोबर आपला सहाय्यक किंवा आधार म्हणून जो लाकडी दंड घेतला जातो त्यालाही स्नान घालून त्याचीही पूजा केली जाते. नर्मदा परिक्रमेच्या कालावधीत रोजची पूजा झाल्यावर 'हे नर्मदा मैय्या आजपर्यंत नियमांचे पालन केलेले आहे, चुकून काही अनैतिक वर्तन घडले असेल तर मला क्षमा कर' असे मनाशी म्हणावे.

आम्ही उभयतांनी डोंबिवली पोलिस स्टेशनला विनंती करून त्यांच्याकडून सामाजिक सुरक्षिततेचा विचार करून एक ओळख पत्र घेऊन बरोबर बाळगलेले होते. प्रत्यक्ष संकल्प विधी करून नर्मदा परिक्रमा सुरू करण्यापूर्वी श्रीक्षेत्र ओंकारेश्वराची ओंकार मांधाता म्हणून सात किलो मीटरची परिक्रमा आहे ती पूर्ण केली. या परिक्रमेचे वैशिष्ट्य म्हणजे ओंकारेश्वर हे ॐ आकारातल्या डोंगरावर कावेरी व नर्मदा नदीच्या संगमावर बेट आहे. आपण ही ओंकर मांधाताची परिक्रमा करतो त्यावेळी ॐ आकारात चालतो व शेवटी ओंकरेश्वराच्या शिवलिंगाचे दर्शन होते. म्हणून ओंकार मांधाताची परिक्रमा महत्त्वपूर्ण आहे. ही ओंकार मांधाताची परिक्रमा करु शकलात तर शारिरिक व मानसिक दृष्ट्या आपण सक्षम आहोत व नर्मदा परिक्रमा आपण सहजपणे पुरी करु शकतो हा आत्मविश्वासही दृढ होतो. एकदा आपण संकल्प विधी करुन नर्मदा परिक्रमेला सुरूवात केली की नर्मदा ओलांडून ओंकारेश्वरला जाता येत नाही.

घरातून परिक्रमेला निघण्यपूर्वी नर्मदा परिक्रमा मार्गदर्शिका किंवा तत्सम पुस्तक जे अत्यल्प किंमतीत उपलब्ध आहे त्याची एक प्रत घरी ठेवावी. सध्या मोबाईल किंवा एस.टी.डी.ने संपर्क ठेवणे सहज शक्य असल्यामुळे घरच्यांची किंवा आप्तांची मानसिक नर्मदा परिक्रमाही होत असते व तेही निश्चिंत राहतात. नर्मदा परिक्रमा पायी करणाऱ्यांसाठी ओंकारेश्वर येथील धर्मशाळांतून नर्मदा परिक्रमा मार्गदर्शिका मोफत उपलब्ध आहे. या पुस्तकात नर्मदा परिक्रमा मार्गातील गावांची नावे अंदाजे अंतर, सदावर्त सेवा, रात्रीच्या वास्तव्यासाठी आश्रम, देऊळ, धर्मशाळा यांची माहिती, उपनद्यांची नावे व संगम, वैयक्तिक सेवा देणाऱ्या व्यक्तींची माहिती, सेवा संस्थांची माहिती, धार्मिक स्थळांचे महत्त्व, परिक्रमा मार्गाचा नकाशा अशी उपयुक्त माहिती दिलेली आहे. आपल्या घरी या पुस्तकाची एक प्रत घरी ठेवण्याचा फायदा म्हणजे आता अमुक एका महत्त्वाच्या ठिकाणाच्या तुम्ही अगदी जवळ आहात, हे ठिकाण चुकवू नका अशा सूचनाही घरुन येत राहतात.

आम्ही उभयतांनी नर्मदा परिक्रमा सुरू करण्यापूर्वी ठरविलेले होते की धार्मिक कर्मकांडात गुंतुन रहावयाचे नाही. आम्ही दोघेही सामाजिक कार्याशी निगडित असल्यामुळे परिक्रमा परिसरातील समाजजीवन, शेती, शिक्षण, आरोग्य, जातिभेद, वर्णभेद, जंगल, प्राणी, पक्षी यांतील विविधता, नर्मदेबद्दलची आत्मीयता याबद्दल माहिती जाणून घेण्याच्या प्रयत्नात होतो. खरतर ही सर्व माहिती मिळवयाची असेल तर वर्षानुवर्षे त्या परिसरात राहिले पाहिजे. हिंडले पाहिजे हे माहीत असूनसुद्धा १२८ दिवसांच्या प्रवासात जमेल तेवढी माहिती मिळवून आम्ही उभयतांनी जो आनंद मिळवला; तो सर्वांपुढे मांडावा व आपण सर्वांनी जमेल तसा तो अनुभवावा. सध्या अंदाजे दीड लाख भाविक विविधप्रकारे म्हणजेच सायकल, मोटारसायकल, जीप-कार किंवा बसने नर्मदा परिक्रमा करतात. सुमारे दहा हजार नर्मदा परिक्रमावासी पायी परिक्रमा करतात. नोकरीधंद्या निमित्त काही भाविकांना एवढा कालावधी नर्मदा परिक्रमेसाठी उपलब्ध नसतो.

सात्विक गुण अंगी बाणविल्याशिवाय आध्यात्मक्षेत्रात कणभरही प्रगतीची अपेक्षा ठेवणे व्यर्थ होय.

त्यानी खंडप्राय नर्मदा परिक्रमा कशी करावी या बद्दलची शास्त्र संमत माहिती पुस्तकेही उपलब्ध आहेत. जशी जमेल तशी नर्मदा परिक्रमा करा पण ती मनापासून करा हे महत्त्वाचे.

**समाज जीवन**

नर्मदा परिक्रमा मार्गातील समाजजीवनाबद्दल म्हणायचे झाले तर हा भाग प्रामुख्याने शेती प्रधान आहे. लोक अत्यंत कष्टाळू आहेत. बाराही महिने शेतीतून विविध प्रकारची उत्पन्ने घेऊन स्वतःचीच नव्हे तर आपल्या राज्याचीही समृद्धी कशी होईल याकडे विशेष लक्ष देतात. विशेषतः मध्यप्रदेश मधले शेतकरी अभिमानाने सांगतात की संपूर्ण भारतभर एकेकाळी पंजाब राज्य गव्हाचा पुरवठा करीत होते. आज आम्ही त्यांना उत्पादनाच्या बाबतीत मागे टाकलेले आहे. भारताच्या कुठल्याही राज्यातल्या कुठल्याही खेडेगावात जा तिथे तुम्हांला मध्यप्रदेशमधली शेती उत्पादने उपलब्ध आहेत आणि तीही माफक किंमतीत! केवढी ही शेतीविषयक तळमळ व उदारता. या ठिकाणी प्रत्येक लहानमोठा शेतकरी आपल्यावर अवलंबून असलेल्या कुळांची किंवा शेतमजुरांची सर्वतोपरी काळजी घेऊन त्यांना परागंदा होऊ देत नाही. या कुळांशी किंवा शेतमजुरांशी यांचे व्यवहार आपल्याच घरातील एक सदस्य या नात्याने होत असतात. याचा प्रत्येय म्हणजे पुणे, मुंबई किंवा तत्सम शहरांतून उत्तर प्रदेश किंवा बिहार किंवा अन्य राज्यांचे लोक मजुरीची कामे करताना आढळतात. तुलनेने मध्यप्रदेशमधील लोक जवळपास नाहीतच. नर्मदेकाठची जमीन अत्यंत सुपीक आहे. केमिकल्स मिश्रित खते न वापरता शेणखत, गांडुळखत, शेळ्यामेंढ्यांचे लेंडीखत अशी सहज उपलब्ध खते वापरली जातात. नर्मदेचे पाणी अमृत आहे. आम्हाला खतांची सुद्धा आवश्यकता नाही असे म्हणणारे शेतकरी ही आम्ही पाहिले. एकंदर २८ ते ३० प्रकारची शेती उत्पादने येथील शेतकरीही घेतात. भारतातच नव्हे तर भारताबाहेर म्हणजे परदेशातही पाठवण्यालायक गुणवत्तापूर्ण असे आपल्या शेतीतील उत्पादन असले पाहिजे यावर त्यांचा भर आहे. शेतीउत्पादनासाठी ज्या ठिकाणची जमीन उपलब्ध किंवा योग्य नसेल त्या ठिकाणी फलोत्पादन घेण्यासाठी तेथील राज्य सरकारे त्या शेतकऱ्याला उद्युक्त करतात. या भागात विविध ठिकाणी विविध केंद्राद्वारे 'सुधारित बीज' सरकारने उपलब्ध करून दिलेले आहे.गरीब आदिवासी कुंटुंबाचा एक समूह बनवून जवळच तलाव किंवा बंधारा बांधून मोफत पंप व अत्यल्प दरात वीज उपलब्ध करून त्यांचे जीवनमान उंचावण्याचा सरकारचा प्रयत्न आहे व त्याचे दृष्य परिणामही आढळून येतात. मध्यप्रदेशाचे सध्याचे मुख्यमंत्री श्री.शिवराजसिंह चौहान हे नर्मदा परिक्रमेतील जैत या लहानशा गावातील अत्यंत गरीब शेतकऱ्याचे पुत्र आहेत. शेतकऱ्यांच्या अडीअडचणींची त्यांना पूर्ण कल्पना आहे. दरमहा परिसरातील सर्व ग्रामपंचायतींना भेट देऊन शेतकऱ्यांशी ते स्वतः सुसंवाद साधत असतात. या परिसरातील शेतकऱ्यांच्या मानसिकतेचा एक विशेष पैलू जाणवला तो म्हणजे येथील शेतकरी सरकारवर अजिबात अवलंबून नाहीत.सरकार आमच्याकडे लक्ष देत नाही किंवा काही करीत नाही, असे रडताना ते दिसत नाहीत. पाऊस जास्त पडो कमी पडो ते निसर्गावरही अवलंबून नाहीत. नर्मदा मैय्या आणि आम्ही हेच त्यांचे सर्वस्व आहे. नर्मदा परिक्रमावासी ही नर्मदेचीच लेकरे आहेत. परिक्रमावासीयांसाठीच नर्मदा मैय्या आम्हाला भरभरुन देते. परिक्रमावासीयांसाठी जितके द्याल त्याच्या कितीतरी पट आपले उत्पन्न वाढेल हा भाव त्यांच्या प्रत्येक कृतीत दिसून येतो.त्यांचे हे विचार ऐकूनच आपण एकदम थक्क होऊन जातो. हे सर्व पाहिल्यावर सहजच महाराष्ट्रातल्या शेतकऱ्यांशी आपल्या मनात तुलना होते. आम्ही उभयता महाराष्ट्रातच जन्मलो. सर्व आयुष्य महाराष्ट्रातच गेले. महाराष्ट्राबद्दल अभिमानही आहे. परंतु खेदाने असे म्हणावे लागते की नर्मदामैय्ये काठचा शेतकरी संस्कार, विचार व त्यातून त्याच्या अंतर्यामी असलेली नर्मदेबद्दलची कृतज्ञता दाखवतो याबाबत महाराष्ट्रातल्या कुठल्याही शेतकऱ्याच्या

तुलनेत तेथील शेतकरी कितीतरी पुढे आहे. आज महाराष्ट्रातल्या शेतकऱ्याला विचारलेत तर तो सरकारची मदत व निसर्गाची मदत मिळून सुद्धा 'नाही हो, चार आणे पण पीक आले नाही' असे सदैव म्हणत असतो. म्हणूनच मग देवही म्हणतो 'तथास्तु'! प्रगतीसाठी कृतज्ञता अत्यंत आवश्यक आहे. आणखी एक फरक प्रकर्षाने आम्हाला जाणवला तो असा की नोव्हेंबर २०१२ च्या शेवटच्या आठवड्यात आम्ही परिक्रमेला सुरुवात केलेली होती. त्याच काळात महाराष्ट्रामध्ये उस उत्पादक शेतकरी व त्यांच्या नेते मंडळींचे उसाला मिळणाऱ्या भावावरुन उग्र आंदोलन चालू होते. सरकरी वाहनांची मोडतोड, जाळपोळ, पोलिसाना मारहाण, रेल रोको-रस्ता रोको त्याचप्रमाणे सरकारी कार्यालयांवर मोर्चे नेऊन सामान्य माणसांनाही वेठीस धरलेले होते. आणि अगदी त्याच्या विरुद्ध शेजारच्याच मध्यप्रदेश राज्यातील उस उत्पादकांना सरकारने घोषित केलेला उसाचा तोच दर मिळाला तरी ते मात्र आनंदात होते. केव्हढा हा वैचारिक फरक. या वेळी अस वाटत की शेतकरी संघटनेच्या सर्व नेते मंडळींनी खरोखरच एकदातरी पायी नर्मदा परिक्रमा करावी व परिस्थितीचा खरा प्रामाणिक अभ्यास करावा.

**शिक्षण**

आता आपण शैक्षणिक स्थिती काय आहे ती पाहू. परिक्रमा मार्गात दर तीन चार किलोमीटरवर सरकारी शाळा आहेत. शाळेच्या इमारती प्रशस्त आहेत आजुबाजुला भरपूर मोकळी जागा आहे. रंगरंगोटी, स्वच्छता, नीटनेटकेपणा यासाठी सरकारकडून मिळालेला निधी त्याचकामासाठी नित्यनेमाने वापरलेला आढळला. मुलांनी रोज शाळेत फक्त यायचे आहे.विद्यार्थ्यांना वर्षातून दोनदा गणवेश सरकार मार्फत दिला जातो. वह्या पुस्तके व इतर साहित्य सरकारच मोफत पुरवते.दूरवरुन येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मोफत सायकलीही सरकारने पुरविलेल्या आहेत. याशिवाय शाळेत मध्यान्ह भोजनही दिले जाते. या मध्यान्ह भोजनाचा आस्वाद आम्हा उभयतांना परिक्रमेच्या कालावधीत सुमारे ४० ते ५० वेळा तरी झाला. अत्यंत रुचकर असे हे मध्यान्ह भोजन असते. सध्या दूरदर्शनवरून या मध्यान भोजनाबाबत दाखविले जाणारे चित्र पाहून आम्हीही संभ्रमित झालेले आहोत. शिक्षणाच्या बाबतीत एक विशेष बाब लक्षात आली की मुलींनी गावकुसाबाहेर जाऊन शिक्षण घेण्याचा प्रघात नाही. एखादा सधन शेतकरी आपल्या मुलीला दूर कुठेतरी एखाद्या मोठ्या शहरात शिक्षणासाठी व्यवस्था करेल, पण शेजारच्या गावात पाठवणार नाही. गावातील महिला वर्गाचे शिक्षणाचे प्रमाण १ ते २ टक्के एवढेच आहे. याबाबतीत महाराष्ट्रातील मुली व महिला खूप भाग्यवान आहेत. महाराष्ट्रात शिक्षणाच्या अनेक संधी उपलब्ध आहेत व त्याचा फायदा सर्वांनाच मिळतो आहे. नर्मदा परिक्रमा मार्गात काही शिक्षकांना या बाबत संवाद साधून सरकारच्या दूरस्थ शिक्षण उपक्रमाबद्दल विचारले असता काही शिक्षकांनी याबाबत काहीही माहिती नाही असे सांगितले व ज्यांना माहिती आहे त्यांनी याबद्दल प्रयत्नही केलेले आढळले नाही. केव्हढी ही वाईट अवस्था, मन विषण्ण होते. घरातील स्त्री शिकली तर घराचाही उत्कर्ष होईल व पर्यायाने समाजाचाही उत्कर्ष होईल. या विचारापासून तिथला समाज खूपखूप लांब आहे. केवळ पंचायत समितीवर सरकारने नेमून दिलेल्या स्त्री सदस्याना घेतले की बस्स्. बाकी सर्व पंचायतीचा कारभार सर्व पुरुष वर्गच सांभाळतो. या गावपंचायतीच्या कारभारावर ठाकूर व पटेल समाजाचे वर्चस्व आहे. ब्राह्मणांना इतर बाबतीत मान असला तरी पंचायतीच्या कारभारात क्वचितच त्यांचा सल्ला घेतला जातो. बाकीचा समाज बहुसंख्येने असूनसुद्धा पंचायतीच्या कारभारात त्यांना गौण स्थान आहे. आजही लहान लहान गावांतून अथवा खेड्यांतून सामाजिक भीतीमुळे शूद्र समाजाचे लोक स्वतःहूनच त्या गावातल्या देवळात जात नाहीत. महाराष्ट्रातून वर्णभेद

कधीच नष्ट झालेला आहे, पण तोच वर्णभेद परिक्रमा मार्गातील खेड्यांतून पाहायला मिळाला. मन विषण्ण करणारे काही अनुभवायला मिळाले. फार वाईट वाटले. असे असून सुद्धा आम्ही उभयता नर्मदा परिक्रमावासी, त्यातून ब्राह्मण पतीपत्नी आहोत हे कळल्यावर व आज आपल्या हातचे जेवणार आहेत हे समजल्यावर त्यांच्या कृतीत व चेहऱ्यावर स्वर्गीय आनंदाचे भाव पाहून आम्हीही सद्‌गदित होत होतो.

आमच्या नर्मदा परिक्रमेत आम्हाला मुस्लीम वस्तीतून जावे लागले व काही ठिकाणी मुक्कामही करावा लागला. नर्मदा परिक्रमावासियांबद्दल या समाजाची काय मत आहेत याची काहीच कल्पना नव्हती. परंतु नर्मदेकाठचा मुस्लीम समाजही नर्मदा मैय्येशी कृतज्ञ आहे हे पाहून आनंद वाटला. नर्मदा मैय्येमुळेच मिळालेली समृद्धता व त्याबद्दलची कृतज्ञता त्यांच्या कृतीतूनच अनुभवायला मिळाली. चहा, पाणी, जेवण, अंथरूण-पांघरूण आम्हाला पुरवून व येथेच रहाण्याचा आग्रह करून अगदी भारावून टाकले. मिश्र वस्ती असलेल्या गावातील देवळातून तर मुस्लीम मुले तेथे चालणाऱ्या आरती, भजने, हनुमान चालीसा म्हणण्यात उत्सहाने भाग घेताना दिसतात.तसेच प्रत्येक शाळेतून रोजच्या शालेय प्रार्थनेबरोबर हनुमान चालीसाही म्हटले जाते हे पाहिल्यावर इतरत्र याच समाजाचा ''वंदेमातरम्'' ला विरोध का? हे प्रश्नचिन्ह उभे रहाते. केवळ नेते मंडळींना सोईनुसार उपयोगी पडावे म्हणून हे हत्यार एवढाच मतलब! एका गावात तर मंदिर व मसजिदमध्ये समाईक भिंत आहे आणि त्या गावात तर शांती आणि सलोख्याचे वातावरण आहे. आमच्या नर्मदा परिक्रमेच्या सुमारास गुजरात राज्यात निवडणुका होऊन विजयी वीरांच्या मतांची आकडेवारी प्रसिद्ध होत होती. बहुसंख्येने मुस्लीम असलेल्या गावांमधून ''सर्व सामान्यासाठी काम करणाऱ्यांच्या झेंड्याचा रंग कोणताही असो आम्ही त्याला निवडून देणारच'' ही तिथल्या समाजाची मानसिकता आहे. एका मुस्लीम विक्रेत्याने तर भर बाजारात आम्हाला बोलावून आंगठ्या भेट म्हणून दिल्या. त्यावर ''ॐ'' कोरलेला आहे हे पाहून आश्चर्य वाटले. त्या विक्रेत्यासमोरच कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी ''सर्वेपि सुखिनः संतु सर्वे सन्तु निरामया....'' हा पूर्ण श्लोक म्हणालो. त्याला संस्कृत समजणार नाही म्हणून हिंदीतून श्लोकाचे रुपांतर म्हटले व नर्मदा मैय्याला प्रार्थना केली की तू याचा सांभाळ कर. हे सर्व आम्ही म्हटल्यावर त्याच्या डोळ्यातले समाधानाचे आनंदाश्रू बरेच काही सांगून गेले. शेवटी तो विक्रेता म्हणाला की ''प्यार मोहब्बत, इन्सानियत और नर्मदा मैय्याका आशीर्वादही हमे चाहिये बस्स् और कुछ नही.'' ज्या ज्या ठिकाणी आम्हाला मदत मिळत गेली त्या त्या ठिकाणी ''सर्वेपि सुखिनः संतु सर्वे संतु निरामया....'' त्याचे हिंदी रुपांतर म्हणण्यापलिकडे कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी अधिक आमच्याकडे काहीही नव्हते.

स्त्री आरोग्य व बालसंगोपन या संबंधी मोठ मोठी पोस्टर्स-बॅनर्स लावले गेलेले आहेत. परंतु प्राथमिक आरोग्य केंद्रे व रुग्णालये तुलनेने कमीच वाटली. येथील लोकांना मोठ्या गावातील रुग्णालयांवरच अवलंबून रहावे लागते. महाराष्ट्रासारखीच स्थिती तेथेही आहे.(क्रमशः)

**सौ. मंगला अशोक वझे**
**श्री. अशोक माधव वझे**
अे/५ गुरुछाया सोसायटी,
गणेश मंदिर पथ, डोंबिवली (पूर्व)
जि. ठाणे, पिन - ४२१ २०१
फोन नं.(०२५१) २४३१४६१
मोबाईल : ९८१९२०१६५२,९८२०३५१८१२

●●●

केवळ एकाग्रता असेल तर विचार संकुचित, मर्यादित आणि भंगणारा होतो.

# परिसर वार्ता

**– संकलित**

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर, माध्यमिक विभाग

### ऑक्टोबरमधील घडामोडी

- दि. ११/१०/२०१३ रोजी इ. ५ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी भोंडला घेण्यात आला. भोंडल्यांच्या विविध गाण्यावर नृत्य करण्यात आले. खीरापतीचा कार्यक्रम घेण्यात आला.
- दि.१७/१०/२०१३ रोजी फ्लोटिंग कॅन्डलची कार्यशाळा इ. ५वी ते ७ वीच्या विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आली. विद्यार्थ्यांनी विविध आकारात पणत्या सजवल्या.
- दि. २२/९/२०१३ रोजी कळवा येथे जलतरण स्पर्धा झाली. कु. दिशा अरविंद भागवत हिला 100M मध्ये द्वितीय 200M मध्ये द्वितीय 400M मध्ये तृतीय क्रमांक प्राप्त झाला व पुढील विरार येथे होणाऱ्या स्पर्धेस पात्र ठरली. विरार येथे झालेल्या स्पर्धेत पाचवा क्रमांक प्राप्त झाला.

### सप्टेंबरमधील घडामोडी

- दि. ९/९/२०१३ रोजी 'श्री' चे आगमन
- दि. ७/९/२०१३ रोजी उमाजी नाईक जयंती दिन साजरा करण्यात आला.
- दि. ५/५/२०१३ रोजी 'शिक्षक दिन' साजरा केला. या शिक्षक दिनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांनी शिक्षक म्हणून काम केले. यांना मार्गदर्शन मा. मुख्याध्यापक व शिक्षकांनी केले.
- दि. १७/९/२०१३ रोजी 'हिंदी दिन' साजरा करण्यात आला. मा. मुख्याध्यापक श्री. गवई यांनी विद्यार्थ्यांना हिंदी दिवसाच्या शुभेच्छा दिल्या.
- भारत विकास परिषदेतर्फे गुणवंत शिक्षक पुरस्कारांर्गत सौ. कल्पना बोरवणकर यांना गुणवंत शिक्षक पुरस्कार तर गुणवंत विद्यार्थी म्हणून कु. ऋजुता नयन काबाडी व रोशनी संजय दिघे यांना गौरविण्यात आले.
- 'लायनेस क्लब ऑफ उपवन' ठाणे तर्फे दिला जाणारा 'आदर्श शिक्षक' पुरस्कार मा. मुख्याध्यापक श्री. जगन्नाथ गवई यांना मिळाला असून गुणवंत विद्यार्थी म्हणून कु. वैष्णवी कदम तर कृतीशील शिक्षिका म्हणून सौ. साधना कारंडे–जोशी यांना सन्मानित करण्यात आले.
- दि. २९/९/२०१३ रोजी दरवर्षीप्रमाणे कै. जानकीबाई गोखले गीता पठण स्पर्धा विद्या प्रसारक मंडळाने आयोजित केली होती. या स्पर्धेत आपल्या शाळेतील कु. चिराग देवराम विधाटे याने मोठ्या गटात तसेच कु. ऋचा योगेश जोशी हिने लहान गटात सर्वप्रथम येण्याचा मान पटकावला.

## सौ. आनंदीबाई जोशी माध्यमिक विभाग

### स्त्री कल्याण संघटने तर्फे आयोजित वक्तृत्व स्पर्धा

अनिश हरकरे – द्वितीय पारितोषिक

### इनरव्हिल क्लब ऑफ ठाणे नॉर्थ एन्ड तर्फे आयोजित चित्रकला स्पर्धा

शिवानी पिसाट – तृतीय पारितोषिक

### आदर्श शिक्षक आणि आदर्श विद्यार्थी पुरस्कार

- उपवन लायनेस क्लब तर्फे दिला जाणारा आदर्श शिक्षक पुरस्कार श्री. अशोक अहेर यांना तर आदर्श विद्यार्थी पुरस्कार कु. ओम बापट याला मिळाला.
- ब्राह्मण सेवा संघातर्फे दिला जाणारा आदर्श शिक्षक पुरस्कार सौ. पूर्णिमा साठे यांना मिळाला.

---

प्रार्थनेला मिळणारे उत्तर ही ज्ञानाची प्रतिक्रिया असते.

**सांस्कृतिक कला दर्पण आयोजित आंतरशालेय विविध स्पर्धेचा निकाल**

| क्र. | स्पर्धा | गट | विद्यार्थ्यांचे नाव | निकाल |
|---|---|---|---|---|
| १. | इंग्रजी वकृत्व स्पर्धा | ७ वी ते ८ वी | मैत्रयी भारती | द्वितीय |
| | | | जान्हवी साने | उत्तेजनार्थ |
| | | ९ वी ते १० वी | गायत्री पाटील | प्रथम |
| | | | शलाका सोनजे | द्वितीय |
| २. | मराठी वकृत्व स्पर्धा | ७ वी ते ८ वी | शांभवी जोशी | प्रथम |
| | | | श्रृती कुलकर्णी | उत्तेजनार्थ |
| | | ९ वी ते १० वी | सायली तवटे | प्रथम |
| ३. | एकपात्री अभिनय | | मैत्रयी भारती | द्वितीय |
| | | | मयांक पाटणकर | उत्तेजनार्थ |
| | | | मृगांक पाटणकर | उत्तेजनार्थ |
| | | | विभव रानडे | उत्तेजनार्थ |
| | | | साक्षी भट | उत्तेजनार्थ |
| | | | रिया गुजरे | उत्तेजनार्थ |
| | | | सिद्धी कानिटकर | उत्तेजनार्थ |
| ४. | गायन | | वरद काणे | प्रथम |
| | | | राज्वी पोलाडिया | प्रथम |
| | | | श्रावणी राणे | उत्तेजनार्थ |

**निसर्ग मेळा तर्फे आयोजित आंतरशालेय विविध स्पर्धेचा निकाल**

| क्र. | स्पर्धा | विद्यार्थ्यांचे नाव | निकाल |
|---|---|---|---|
| १. | पक्षी ओळखा | सानिका गोरे व प्रज्ञा घारपुरे | प्रथम |
| २. | विज्ञान प्रश्नमंजुषा | श्रीदीप क्षिरसागर व अमेय दानोळे | उत्तेजनार्थ |
| ३. | चित्रकला | विभव कोदे | उत्तेजनार्थ |
| ४. | वक्तृत्व | सानिक जोशी | उत्तेजनार्थ |
| ५. | शुभेच्छा पत्र | अमेय दानोले | उत्तेजनार्थ |
| ६. | उत्स्फुर्त वक्तृत्व | सानिक जोशी | उत्तेजनार्थ |
| ७. | पथनाट्य | मोहित मुसळे, सुधर्म करमरकर, चिन्मय मराठे, सानिका जोशी, मैत्रयी भारती, अर्थव जोशी, श्रुती कुलकर्णी, तितिक्षा फडणीस, सेजल खेडेकर | द्वितीय |

प्रार्थना विनवणी यांची निर्मिती स्वतःची कीव करण्यांतून होते.

**श्रीकला संस्कार कला तर्फे आयोजित आंतरशालेय नाट्यस्पर्धा**

आमचे नाटक 'माऊली' ने खालील पारितोषिके पटकावली –

१) उत्कृष्ट नाटक – प्रथम क्रमांक व परीक्षकांतर्फे दिले जाणारे विशेष प्रावीण्य पारितोषिक रु.५००/–
२) उत्कृष्ट दिग्दर्शन – सौ. प्रियंका भांगले
३) उत्कृष्ट संगीत – सौ. वीणा जोशी
४) अभिनयाचे प्रशस्तिक पत्रक – कु. साक्षी भट
५) रोख विशेष नैपुण्य पारितोषिक रु.५००/– कु. गौरांग मोरे

**श्रीमती जानकीबाई गोखले गीता पठण स्पर्धा**

ईशान मलिये – उत्तेजनार्थ पारितोषिक

**डी.एस.ओ. तर्फे आयोजित आंतरशालेय क्रिडास्पर्धा**

अ) बॅडमिटन : U14 yrs. व U17 yrs.या वयोगटातील आमच्या शाळेतल्या मुलींनी विजेतेपद पटकावले. U14 yrs. मधील सांघिक खेळाडू–शलाका सहस्त्रबुद्धे. वैष्णवी घाग, भूमिका पाध्ये. U17 yrs. मधील सांघिक खेळाडू – नेहा दिक्षित व किमया हजरनीस.

ब) टेबल टेनिस – U17 yrs. गटातील मुलींनी चांदीचे पदक मिळवले. संघ–रिद्धी संख्येने विजेतेपद मिळवले व ती मुंबई संघासाठी पात्र ठरली.

क) पोहणे – खालील विद्यार्थ्यांना पारितोषिके मिळवली –

१) वैष्णवी देसाई – U17 yrs. वयोगट (मुली)
५० मि. ब्रेस्ट स्ट्रोक – प्रथम क्रमांक
१०० मि. ब्रेस्ट स्ट्रोक – प्रथम क्रमांक
२०० मि. ब्रेस्ट स्ट्रोक – प्रथम क्रमांक

२) सृष्टी नाईक – U14 yrs. वयोगट (मुली)
५० मि. ब्रेस्ट स्ट्रोक – प्रथम क्रमांक
१०० मि. ब्रेस्ट स्ट्रोक – प्रथम क्रमांक

३) नेत्रा भट – U14 yrs. वयोगट (मुली)
५० मि. फ्रि स्टाईल – प्रथम क्रमांक
५० मि. बटर फ्लाय – तिसरा क्रमांक
१०० मि. बटर फ्लाय – तिसरा क्रमांक

४) ओंकार राऊत – U14 yrs.वयोगट (मुली)
५० मि. बॅक स्ट्रोक – द्वितीय क्रमांक

२७ वी तालुका स्तरीय बॅडमिंटन स्पर्धा २०१३

१) वैष्णवी घाग – द्वितीय क्रमांक
२) शलाका सहस्त्रबुद्धे ने U15 yrs. मुलींच्या वैयक्तिक व दुहेरी स्पर्धेत विजेतेपद व U17 yrs. मुलींच्या वयोगटात द्वितीय पारितोषिक पटकावले.

**जोशी बेडेकर कला–वाणिज्य महाविद्यालय**

मुंबई विद्यापीठाने आयोजित केलेल्या ४६ वा युवामहोत्सवास महाविद्यालयाला भरघोस यश प्राप्त झाले. एकूण १६ स्पर्धांमध्ये महाविद्यालयाने अंतिम फेरीत बाजी मारली.

| स्पर्धा | पारितोषिक |
|---|---|
| एकांकिका GR A | तृतीय |
| एकांकिका GR B | प्रथम |
| एकपात्रीप्रयोग GR A | उत्तेजनार्थ |
| उत्कृष्ट स्त्री कलाकार Special Jury Award | |
| एकपात्री प्रयोग GR C | तृतीय |
| Mimc | तृतीय |
| लोकगीत | प्रथम |
| वक्तृत्त्व | द्वितीय |
| वादविवाद | द्वितीय |
| कोलाज | द्वितीय |
| क्ले मॉडेलिंग | द्वितीय |
| On the Spot painting | तृतीय |
| रांगोळी | प्रथम |
| Cartooning | तृतीय |
| Installation | द्वितीय |

आंतर महाविद्यालयीन स्पर्धांमध्ये महाविद्यालयाला विविध स्पर्धामध्ये यश प्राप्त झाले.

डहाणूकर महाविद्यालय आयोजित 'कुरुक्षेत्र' या महोत्सवा दरम्यान वक्तृत्त्व स्पर्धेत महाविद्यालयास द्वितीय क्रमांक व रु. २०००/- रुपये रोख रक्कम बक्षिस स्वरुपात प्राप्त झाले.

आचार्य मराठे महाविद्यालय आयोजित 'वॉर ऑफ वर्ड' यात वक्तृत्त्व स्पर्धेत प्रथम पारितोषिक स्मृतिचिन्ह प्राप्त झाले.

साधुबेला गर्ल्स महाविद्यालय आयोजित वादविवाद स्पर्धेत तृतीय पारितोषिक व स्मृतिचिन्ह प्राप्त झाले.

महाविद्यालयातील Student Forum या समिती अंतर्गत 'महाविद्यालयीन निवडणुका आवश्यक की अनावश्यक' या विषयावर विद्यार्थ्यांमध्ये साधक-बाधक चर्चा झाली. ९५ टक्के विद्यार्थ्यांनी निवडणुका असाव्यात यावरच आपले मत व्यक्त केले. स्टुडंट फोरमच्या प्रमुख प्रा. प्रज्ञा राजेबहादूर यांनी महाविद्यालयीन निवडणुकांच्या दोन्ही बाजू विद्यार्थ्यांना अधिक चांगल्या प्रकारे समजावून सांगितल्या.

## बांदोडकर विज्ञान विद्यालय

### विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

दि. ११ ऑगस्ट २०१३ रोजी प्राचार्या डॉ. (सौ.) माधुरी पेजावर यांचे "Choice Base Credit System & Semester System" या विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यान चांगो काना ठाकूर, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पनवेल येथे झाले.

### युवा महोत्सव

युवकांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळवून देण्यासाठी मुंबई विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण विभागातर्फे सर्वत्र युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात येत असते. ४६ व्या आंतरमहाविद्यालयीन युवा महोत्सवाच्या प्राथमिक फेरी (निवड चाचणी) करता आपले महाविद्यालय निवडण्यात आले होते. या युवामहोत्सवात दिनांक १२ ऑगस्ट २०१३ रोजी आपल्या महाविद्यालयात विविध स्पर्धा घेण्यात आल्या. एकूण २३ महाविद्यालये यात सहभागी झाली होती. विद्यार्थ्यांनी जवळजवळ ३९ स्पर्धांमध्ये सहभाग घेऊन रंगत आणली. त्यांत नृत्य, गायन, वक्तृत्त्व, रोगोळी, चित्र रंगविणे, एकांकिका, पदनाट्य, अभिनय, लोकनृत्य अशा विविध स्पर्धांचा समावेश होता.

मुंबई विद्यापीठांतर्गत फक्त विज्ञान शाखा असलेल्या बांदोडकर कॉलेजने सर्व शिक्षक, शिक्षकेतर सहकारी आणि विद्यार्थ्यांच्या मदतीने हा महोत्सव यशस्वी केला. मुंबई विद्यापीठाचे विद्यार्थी कल्याण विभागाचे संचालक श्री. मृदुल निळे यांनी उल्लेखनीय सहभागाबद्दल आपल्या महाविद्यालयास प्रशस्तिपत्र दिले.

### सिद्धान्त क्लब

गणिताच्या या क्लबच्या या वर्षीच्या कार्यक्रमाचे उद्घाटन दि. २३ ऑगस्ट २०१३ रोजी श्री. निकेतन तावरे, संचालक, निर्मला कन्सोल प्रा. लि. यांच्या मार्गदर्शनपर भाषणाने झाले.

### श्री सत्यनारायण महापूजा

दि. २७ ऑगस्ट २०१३ रोजी सालाबादप्रमाणे श्री सत्यनारायण महापूजा जिमखाना हॉलमध्ये पार पडली.

### पालकसभा

११ वीच्या विद्यार्थ्यांच्या पालकांची सभा दि. २७ ऑगस्ट २०१३ रोजी सायं.६ वाजता थोरले बाजीराव पेशवे सभागृहात आयोजित केली होती. त्यामध्ये प्राचार्या डॉ. पेजावर, उपप्राचार्य श्री. काटकर, पर्यवेक्षिका सौ. पुष्पा कृष्णन यांनी पालकांशी विद्यार्थ्यांसंबंधी विविध विषयांवर चर्चा करून विचारांचे आदानप्रदान केले.

## अभिनंदन

प्राचार्या डॉ. माधुरी पेजावर यांना रामकृष्ण बजाज राष्ट्रीय गुणवता पारितोषिक ट्रस्ट यांच्याकडून गुणवत्ता व्यवस्थापनाच्या परीक्षक म्हणून ८ ऑगस्ट २०१३ रोजी मान्यता देण्यात आली.

दि. २८ ऑगस्ट २०१३ रोजी प्रा. प्रकाश माळी, रसायनशास्त्र विभाग यांना ज्ञानसाधना महाविद्यालयातर्फे ''ज्येष्ठ स्वातंत्र्य सेनानी मा. श्री. दत्ताजी ताम्हाणे आदर्श शिक्षक पुरस्कार २०१२-२०१३'' प्रदान करण्यात आला. तसेच प्रा. प्रकाश माळी, यांना स्वामी विवेकानंदांच्या १५० व्या जयंती निमित्त दैनिक गावकरी व समर्थ ॲडव्हायझर्स, कल्याण यांच्यातर्फे ''स्वामी विवेकानंद'' आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. महाराष्ट्र राज्य सरकारच्या आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त प्रा. माळी यांच्या पुरस्कारांमध्ये विविध पुरस्कारांची भर पडत असल्याने आनंद व्यक्त होत आहे. तसेच त्यांना ''मुंबईचा राजा कोण?'' या वीणा वर्ल्ड, भारतीय जीवन बीमा निगम व लोकसत्ता आयोजित गणेश उत्सव मूर्ती स्पर्धेचे परिक्षक म्हणून काम करण्याचा मान मिळाला त्याबद्दल त्या संस्थांनी त्यांचा गौरवही केला.

प्रा. अनिल आठवले, कनिष्ठ महाविद्यालय यांना पुण्याच्या लोकमित्र परिवार, लोकमित्र संस्था यांच्या तर्फे ''राष्ट्रीय कर्तव्य अभियान पुरस्कार २०१३'' दि. १५ सप्टेंबर २०१३ रोजी प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार श्री. आठवले यांच्या शैक्षणिक, सामाजिक, साहित्य, पत्रकारिता, कला, क्रीडा, सहकार क्षेत्रातील योगदानाबद्दल देण्यात आला आहे. प्रा. अनिल ज्ञानू आठवले यांनाच १ ऑक्टोबर २०१३ रोजी ठाणे महापालिकेच्या ३१ व्या वर्धापन दिनी 'ठाणे गुणीजन' या पुरस्काराने गौरविण्यात आले. महाविद्यालयातील सहकाऱ्यांकडून व विविध स्तरातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

## जागर जाणिवांचा

''राज्य सरकारच्या ''जागर जाणिवांचा'' या कार्यक्रमाचे उद्‌घाटन सकाळ दैनिकाचे संपादक व ८४ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष श्री. उत्तम कांबळे यांच्या हस्ते बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयात दि. २८ ऑगस्ट २०१३ रोजी झाले. यावेळी ते म्हणाले मानवी जीवनात जाणिवांमधूनच क्रांती घडली आहे. मात्र या जाणिवा कमी होत गेल्यानंतर माणसाचा प्रवास उलट्या दिशेने सुरु होतो. बंद दरवाजाआड राहणारी व्यक्ती ही प्रतिष्ठित तर दरवाजा उघडा असलेली व्यक्ती अप्रतिष्ठित अशी नवी संकल्पना उदयास येत आहे. माणूस जाणिवा संपवून जगत आहे. यंत्रे माणसाची गुलाम व्हायला हवीत परंतु माणूसच यंत्राचा गुलाम होताना दिसत आहे. आधुनिक जगातील माणूस हा 'मोबाईल सीक' होत आहे. भाषेची जागा कोड (संकेत) ने घेतली आहे.

''जागर जाणिवांचा'' ह्या व्याख्यानांच्या मालिकेतील दि. २५ सप्टेंबर २०१३ रोजी झालेल्या भाषणात प्राचार्या डॉ. माधुरी पेजावर यांनी महिलांवरील अत्याचाराचा परामर्श घेत, आपण पुन्हा पाषाण युगाकडे वाटचाल करीत तर नाहीना? असा प्रश्न उपस्थित केला.

## जपानच्या विद्यार्थ्यांची भेट

जपानच्या क्योटो सोंगोय विद्यापीठाच्या प्रो. मिशियो यानो व त्यांच्या १५ विद्यार्थ्यांनी आपल्या महाविद्यालयाला दि. ५ सप्टेंबर २०१३ रोजी भेट दिली. आपल्या देशाच्या कला व संस्कृती विषयी जाणून घेण्यासाठी ही भेट होती. पाहुण्यांचे आपल्या महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी विविध कला कार्यक्रम सादर करून मनोरंजन केले.

## संशोधन निबंध

सौ. आरती देऊस्कर यांनी इनोव्हेटिव्ह टीचिंग ॲण्ड सस्टेनन्स ऑफ क्वालिटी इन हायर एज्युकेशन या

आचार्य व मराठे महाविद्यालय, चेंबूर येथे दि. ६ व ७ सप्टेंबर २०१३ रोजी आयोजित परिषदेमध्ये आपला संशोधन निबंध सादर केला.

**कार्यशाळा**

आपल्या महाविद्यालयाच्या IQAC (अंतर्गत गुणवत्ता आश्वासक समिती) तर्फे दि. ५ ऑक्टोबर २०१३ रोजी ''अंतर्गत गुणवत्ता राखण्यात IQAC चे कार्य'' या विषयावर एक कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. कार्यशाळेत विविध महाविद्यालयांचे प्राचार्य, IQAC चे संघटक, शिक्षक मिळून ५० प्रतिनिधींनी व आपल्या महाविद्यालयाच्या ४० शिक्षकांनी सहभाग घेतला. सदर कार्यशाळेत नॅकचे डॉ. बी. एस. मधुकर, Deputy Adviser, NAAC, Bangalore, प्राचार्य डॉ. एम. आर. कुरुप, Secretary KVT Mulund, डॉ. के. वेंकटरमणी, Registrar, D.Y. Patil Vidyapeeth, प्राचार्या डॉ. सौ. शकुंतला सिंग, जोशी-बेडेकर महाविद्यालय, प्राचार्य डॉ. विजय जोशी, K. J. Somaiya College, तसेच प्राचार्या डॉ. सौ. माधुरी पेजावर यांनी मार्गदर्शन केले. महाविद्यालयांच्या गुणवत्तेत वाढ करण्यासाठी काय करावे, गणुवत्तचे मूल्यमापन कसे करावे आदी विषयांवर सखोल चर्चा होऊन कार्यशाळेतून बहुमोल मार्गदर्शन लाभले. या कार्यशाळेत प्रथमच उपप्राचार्य डॉ. आठल्ये यांनी लिहिलेले व स्वरचना केलेले बा. ना. बांदोडकर महाविद्यालयाचे गीत सादर केले गेले. कार्यशाळेत सहभागी झालेल्या सर्वांनी कार्यक्रमाबद्दल 'उत्तम' शेरा दिला आहे. त्याबद्दल प्राचार्या डॉ. सौ. पेजावर व IQAC संघटक प्रा. सौ. घोलबा यांनी समाधान व्यक्त केले.

## विद्या प्रसारक मंडळाचे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय

•दि. ४ सप्टेंबर २०१३ रोजी विद्या प्रसारक मंडळाच्या जोशी-बेडेकर महाविद्यालयाने आयोजित केलेल्या अर्ध्या दिवसीय कार्यशाळेमध्ये "College Women Development cell & Anti Ragging committee " हा विषय ठेवण्यात आला. सहा. प्रा. विनोद वाघ आणि ग्रंथपाल शीतल औताडे यांनी यामध्ये सहभाग नोंदविला.

•दि. ६ सप्टेंबर २०१३ रोजी प्रा. एम. डी. जोशी यांनी "Group Discussion" या विषयावरती विशेष व्याख्यान दिले. यामध्ये द्वितीय आणि तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी भाग घेतला. व्याख्यानामध्ये पुढील गोष्टींचा समावेश होता.

1) Lecture & Power Point Presentation
2) Videos on group discussion
3) Practice sessions for students

•दि. ७ सप्टेंबर २०१३ रोजी टी.एम.सी. विधी महाविद्यालय, उल्हासनगर येथे झालेल्या 'विधीमंथन' मध्ये आपल्या महाविद्यालयातून १) रंजनी कृष्णन २) कृष्णा कामत या विद्यार्थीनींनी भाग घेतला. यामध्ये पुढील प्रमाणे स्पर्धेचे विषय होते.

१. विधी प्रश्न
२. लिगल मॅक्झीम
३. ग्रुप डिस्कशन इ.

•दि. ७ सप्टेंबर २०१३ के. सी. विधी महाविद्यालय मुंबई येथे "Client Counselling" या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेमध्ये श्री. आकाश वारंज आणि प्रिती महाजन यांनी सहभाग नोंदविला.

**जपानी विद्यार्थ्यांची भेट**

दि. ४ सप्टेंबर जपानच्या १२ विद्यार्थ्यांच्या प्रतिनिधी मंडळाने प्रा. डॉ. मिशिओ यानो यांच्या मार्गदर्शनाखाली सांस्कृतिक देवाणघेवाण या सदरा अंतर्गत विद्या प्रसारक मंडळाच्या संकुलास भेट दिली. (वेळ - ४ ते ६)

आमच्या विधी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी डॉ. सुधाकर आगरकर यांचे सोबत आलेल्या या प्रतिनिधी

मंडळाचे मेनगेटवरती स्वागत करून त्यांना महाविद्यालयातील प्राध्यापक कक्षापर्यंत घेऊन आले. प्राध्यापक कक्षाजवळ त्यांच्या स्वागतासाठी विद्यार्थ्यांनी रांगोळी काढलेली होती. महाविद्यालयाच्या विद्यार्थी परिषदेचे सभासद आणि अन्य विद्यार्थी यांनी जपानी विद्यार्थ्यासोबत मनमोकळ्या उत्साहाने संवाद साधला. पुष्पगुच्छ देऊन स्वागत केल्यानंतर त्यांचेसाठी चहापानाचे आयोजन करण्यात आले. काही विद्यार्थ्यांनी याप्रसंगी पारंपारिक पोशाख परीधान केला होता.

महाविद्यालयाच्या मनु सभागृहात जपानी विद्यार्थ्यांसाठी मनोरंजन, प्रात्यक्षिक आणि सादरीकरण (संस्कृतीचे) ह्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. विनोद वाघ यांनी केले. 'भारतीय संविधान' या विषयावरती प्रभारी प्राचार्या श्रीविद्या जयकुमार यांनी पीपीटी सादर केले. यानंतर प्रा. मिथुन बनसोडे यांनी निवडलेल्या आणि मार्गदर्शन केलेल्या विद्यार्थ्यांनी आपल्या कला सादर केल्या. हिंदुस्तानी गायन, गजल आणि लावणी मुलांनी म्हणून दाखविली. त्यांमध्ये मधुरा देशपांडे आणि वैशाली पाटील यांनी सहभाग घेतला. त्यानंतर श्री. आनंद शेट्टी आणि स्नेहल गायकवाड यांनी की-बोर्ड, गिटार आणि अ‍ॅकोरडीअल ह्या वाद्यांचे प्रात्यक्षिक करून दाखविले.

यानंतर भारतीय नृत्य, रांगोळी, मेहंदी यावरती पावर पॉईंट प्रेझेंटेशन दाखविण्यात आले. रांगोळी आणि मेहंदीचा जपानी विद्यार्थीनींनी आनंद घेतला. आपल्याही विद्यार्थ्यांना यामुळे एक वेगळा अनुभव मिळाला.

### हेन्री डुरांत मेमोरीअल अभिरुप न्यायालय स्पर्धा (२०१३)

सन २००१ पासून राष्ट्रीय पातळीवर दिल्ली येथे अभिरुप न्यायालयाची ही स्पर्धा इंडीयन सोसायटी ऑफ इंटरनॅशनल लॉ आणि इंटरनॅशनल कमिटी ऑफ रेड क्रॉस यांच्यावतीने आयोजित करण्यात येते. आंतरराष्ट्रीय मानवी कायद्यासंदर्भात जगजागृती करणे हा या मागचा उद्‌देश असतो. यावर्षी संपूर्ण भारतातून ६३ संघानी यामध्ये सहभाग घेतला होता. आपल्या विधी महाविद्यालयातून

श्री. संकेत लेले - तृतीय वर्ष विधी ) मूटर
कु. रंजनी कृष्णन - द्वितीय वर्ष विधी )
कु. कृष्णा कामत - द्वितीय वर्ष - संशोधक

यांनी भाग घेतला. या स्पर्धेसाठी युद्ध गुन्ह्यातील उत्तरदायित्त्व ह्या विषयावरती आंतरराष्ट्रीय क्रिमिनल कोर्टासमोर केस ठेवण्यात आली होती. या स्पर्धेच्या गुणपत्रिकेनुसार आपल्या महाविद्यालयाची निवड पहिल्या २० महाविद्यालयांत झाली. (गुण - ६२%)

### रांका राष्ट्रीय अभिरूप न्यायालय स्पर्धा -२०१३ (२८-३० सप्टेंबर २०१३)

युनिवर्सिटी फाईव इयर लॉ कॉलेज हे राजस्थान युनिवर्सिटीने स्थापन केले असून त्यांनी रांका राष्ट्रीय अभिरुप न्यायालय या स्पर्धेचे आयोजन केले होते. या स्पर्धेमध्ये गँगरेपची केस अपिलमध्ये सर्वोच्च न्यायालयासमोर युक्तीवादासाठी ठेवण्यात आली होती.

या स्पर्धेसाठी आपल्या महाविद्यालयातून

श्री. गौतम जैन - द्वितीय विधी
श्री. आकाश वारंग - प्रथम विधी
श्री. विनोद खरे - संशोधक
यांचा सहभाग होता.

संपूर्ण भारतातून या स्पर्धेमध्ये ६० (साठ) संघानी सहभाग घेतला होता. आपल्या महाविद्यालयातून श्री. आकाश वारंग यांनी 'बेस्ट मूटर' साठीचे द्वितीय पारितोषिक पटकाविले. गुणपत्रिकेनुसार आपले महाविद्यालय २४ व्या स्थानावर होते.

**डी. वाय. पाटील राज्यपातळी अभिरुप न्यायालय स्पर्धा ( २८ सप्टेंबर २०१३)**

डी. वाय. पाटील विधी महाविद्यालय यांनी या स्पर्धेचे आयोजन केले होते. या स्पर्धेमध्ये १४ संघांनी सहभाग घेतला. यामध्ये स्पॉट फिक्सींगचे गुन्हे आणि स्पोर्ट बेटींगच्या कायद्याची संविधानिकता या विषयावर युक्तीवाद ठेवण्यात आला होता.

आपल्या महाविद्यालयातून

श्री. मनिष काळे (मूटर)
श्री. सौनिल राम्बीया (मूटर)
श्री. संजय नाईक (संशोधक)

यांनी सहभाग घेतला.

**स्त्री समस्या सेन्सीटायझेशन प्रोग्राम (२६.०९.२०१३) वेळ – ६ ते ७**

महाविद्यालयातील वूमन डेव्हलपमेंट सेलच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. डॉ. श्रीमती स्वाती गाडगीळ भूलतज्ज्ञ, विधी व्याख्याती आणि सामाजिक कार्यकर्त्या यांनी या विषयावती पॉवर पाईंट प्रेझेंटेशन देवून लिंगविषयक समस्यांवर प्रकाश टाकला. विभागीय सह संचालकाची दिनांक २७ सप्टेंबर २०१३ ची चंगुभाई ठाकुर महाविद्यालय, पनवेल येथील बैठक.

विभागीय सह संचालक, पनवेल यांनी विभागातल्या सर्व ९४ प्राचार्याची व कारकुनाची बैठक दिनांक २७ सप्टेंबर २०१३ रोजी बोलावली होती.

वि. प्र. मं. हि एम. सी. विधी महाविद्यालयातर्फे प्रभारी प्राचार्या श्रीमती श्रीविद्या जयकुमार, श्रीमती रंजन करंदीकर व मुकेश राणे यांनी सहभाग नोंदविला.

सदर बैठक दुपारी १२.२० वाजता सुरु होवून एका मध्यान्हसह सायंकाळी ४.४० वाजता संपली. डॉ. कदम यांनी वेगवेगळ्या विषयावर माहिती व सुचना दिली. महाविद्यालयांनी देखील आपले म्हणणे मांडले.

१) सह संचालक हे खालील विषयाच्या तपासणीसाठी महाविद्यालयात येवू शकतात.

१. शिकवणी वर्ग व त्याची योग्यता तपासणीसाठी
२. महाविद्यालयातील
३. शौचालय व सामुहिक कक्ष सुविधा, ग्रंथालय सुविधा व पुस्तकांची उपलब्धता
४. वाचनालय, ग्रंथालय सुविधा व पुस्तकाची उपलब्धता
५. अपंगासाठी विशेष पायऱ्याची सुविधा
६. बायो मेट्रीक उपस्थिती
७. महाविद्यालय, वर्ग व ग्रंथालयात शिक्षकाची उपस्थिती

१. सह संचालकानी असेही सांगितले की प्रत्येक शिक्षकाने किमान ४० तास तरी आठवड्यात हजर पाहिजे.

२. पी. एफ. ची माहिती महाविद्यालयाने संगणकीय माध्यमातून मिळवावी

३. सेवा पुस्तक व रजेच्या नोंदीची व्यवस्थित माहिती ठेवावी.

४. कर्मचाऱ्याचे वेतन त्यांच्या बँक खात्यामध्ये जमा होण्यासाठी 'HTE Service' माहिती दिली.

वरील सगळी माहिती व कार्यक्रम हा मराठीतूनच करण्यात आला.

**अभिरुप न्यायालय स्पर्धा**

वि. प्र. मं. चे टि.एम.सी. विधी महाविद्यालयाने दिनांक ११ सप्टेंबर २०१३ तृतीय विधी आणि द्वितीय विधी वर्षाच्या विद्यार्थ्यासाठी अभिरुप न्यायालय स्पर्धा आयोजित करण्यात आली. बार कौसिल ऑफ इंडीयाच्या एका ठरावाला विरोध किंवा समर्थन करण्याचा मुद्द्यावर ही स्पर्धा ठेवण्यात आली होती. सदर स्पर्धेसाठी ॲड.

अरुण जालीसाटगी व ॲड. गणेश बद्री यांची न्यायाधीश म्हणून नेमणूक करण्यात आली. या स्पर्धेमध्ये अनेक विद्यार्थ्यांनी भाग घेतला. प्रथम पारितोषिक आनंद शेट्टी या तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यास मिळाले. संकेत लेले यास द्वितीय तर संगीता रोकडे व देवकी नंदन यांना तृतीय पारितोषिक विभाजून देण्यात आले.

### अभिरुप न्यायालय स्पर्धा

वि. प्र. मं. चे टि.एम.सी. विधी महाविद्यालयाने दिनांक १४ सप्टेंबर २०१३ रोजी प्रथम विधीच्या विद्यार्थ्यासाठी अभिरुप न्यायालय स्पर्धेचे आयोजन केले होते. कामगार कात्रदेव ग्राहक संरक्षण कायदा या विषयावर आधारीत असलेल्या या स्पर्धेमध्ये १६ विद्यार्थ्यांनी भाग घेतला. न्यायाधीश म्हणून ॲड. काझी व ॲड. मनोज भट होते. या स्पर्धेमध्ये एकूण पाच पारितोषिके दिली गेली.

१. प्रथम – शिवकुमार अे. आर.

२. द्वितीय – राजन लाकुरे

३. तृतीय – मनीष काळे

४. चार – आकाश वारंज

५. पाचवे – अबोली देवकर

### पत्रकार समुपदेशन स्पर्धा

दिनांक १४ सप्टेंबर २०१३ रोजी पत्रकार समुपदेशन (Client Counselling) स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. प्रा. विनोद एच. वाघ व ॲड. शेख हे स्पर्धेचे न्यायाधीश म्हणून उपस्थित होते. महाविद्यालयाच्या अनेक प्राध्यापकांनी यावेळी पत्रकाराच्या भूमिकेतून विद्यार्थ्यांना करार कायदा, अपकृत्य विषयक कायदा, ग्राहक संरक्षण कायदा मुलभूत अधिकार अशा विविध विषयावर समस्याचे कायदेशीर निराकरण विचारले. प्रभारी प्राचार्या श्रीविद्या जयाकुमार, प्रा. मिथुन बिनसोडे, ॲड. मनोज भट, प्रा. दातार मॅडम यांनी पत्रकाराच्या भूमिका साकारल्या. या स्पर्धेमध्ये प्रथम बक्षीस आकाश वारंज, द्वितीय संकेत लेले व तृतीय बक्षीस आनंद शेट्टी व संतोष गिरी या विद्यार्थ्यांना देण्यात आले.

### कायदा साक्षरता अभियान

विधी महाविद्यालयाने कर्जत तालुक्यातील ममदातूर या गावामध्ये दिनांक २१ सप्टेंबर २०१३ रोजी कायदा साक्षरता अभियानाचा कार्यक्रम घेतला. यावेळी प्रा. विनोद एच. वाघ व ॲड. शिंदे यांच्यासह एकूण १४ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यावेळी पथनाट्य, गवळण, गीत, भाषण अशा विविध माध्यमांतून संविधान, ग्राहक तक्रार, स्त्रियांवरील अन्याय, पोलीस जुलूमशाही, भ्रष्टाचार, लोक अदालत व कायदेशीर सेवा अशा अनेक विषयावर जन जागृती करण्यात आली. यावेळी ममदातूर गावाचे ग्राम सभा सदस्य, शिक्षक व ग्रामस्थ मोठ्या संखेने हजर होते.

विधी महाविद्यालयाने अर्थ फाउंडेशन ठाणेच्या सहकार्याने दिनांक ५ ऑक्टोबर २०१३ रोजी प्रागंणातील पेशवे सभागृह येथे सामाजिक व कायदेशीर दृष्टीने स्त्रियांवर होणाऱ्या लैंगिक अपराधांसंबंधी चर्चा सत्राचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या सुरुवातीला 'महिला आणि समाज' या विषयावर विद्यार्थ्यांनी कविता सादर केल्या.  अधिवक्ता श्रीमती माधवी नाईक यांनी वर्मा आयोग २०१३ या विषयाच्या शिफारशी संबंधी माहिती दिली. अधिवक्ता श्री. पंचाक्षरी यांनी फौजदारी कायद्यातील सुधारणा २०१३ याविषयावर मार्गदर्शन केले. श्रीमती नयना सहस्त्रबुद्धे यांनी 'स्त्रियांचे होणारे लैगिंक शोषण' या विषयांवर मार्गदर्शन केले. यानंतर 'खुल्या चर्चा सत्राचे' आयोजन करण्यात आले होते. यामध्ये विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. एकूण चर्चासत्राच्या अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्या श्रीमती श्रीविद्या जयाकुमार होत्या. या कार्यक्रमामध्ये विद्यार्थ्यांनी एक नाटक देखील सादर केले. सूत्रसंचालन प्रा. मिथुन बनसोडे यांनी केले तर आभार प्रदर्शन विद्यार्थ्यांनी कु. हेमाली पाटील यांनी मांडले.

### दहा दिवसीय कार्यशाळा

प्रवीण गांधी विधी महाविद्यालय, विलेपार्ले, मुंबई यांनी सामाजिक शास्त्रांमध्ये शोध पद्धत या विषयावर दहा दिवसीय कार्यशाळा अयोजित केली होती. (दिनांक १६ ऑक्टोबर ते २५ ऑक्टोबर २०१३) सदर कार्यशाळा भारतीय सामाजिक विज्ञान संशोधन मंडळाच्या (ICSSR) च्या सहयोगाने आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेमध्ये विधी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या श्रीमती श्रीविद्या जयाकुमार यांनी सहभाग नोंदविला.

### सराव परीक्षा सत्र १,३ आणि ५

विधी महाविद्यालयामध्ये तिन्ही विधी वर्गाच्या सत्र १, ३ आणि ५ च्या सराव परीक्षा घेण्यात आल्या. दिनांक २१ ऑक्टोबर ते २४ ऑक्टोबर २०१३ दरम्यान या परीक्षा घेण्यात आल्या.

### विशेष मराठी शिकवणी वर्ग

वि. प्र. मं. चे टि.एम.सी. विधी महाविद्यालयामध्ये खास मराठीमध्ये परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी दिनांक ७ ते १२ ऑक्टोबर २०१३ या दरम्यान विशेष मराठी शिकवणी वर्ग घेण्यात आले प्रथम व द्वितीय विधी विद्यार्थ्यासाठी हे शिकवणी वर्ग आयोजित करण्यात आले होते. या व्यतिरिक्त दिनांक २५ ते ३० ऑक्टोबर २०१३ या दरम्यान उजळणी वर्ग घेण्यात आले होते.

### २ दिवसाचे राष्ट्रीय चर्चासत्र

'Consumerism And Consumer Protection' दिनांक २६ व २७ ऑक्टोबर २०१३ रोजी संदेश विधी महाविद्यालय, विक्रोळी येथे 'Consumerism And Development of Consumer Protection Laws' या विषयावरील चर्चासत्रात महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या सौ. श्रीविद्या जयकुमार यांनी व्यावहारिक सत्राचे अध्यक्ष म्हणून काम पाहिले.

## तंत्रनिकेतन

### राजीव गांधी अक्षय ऊर्जा दिन-२०१३

विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतनातील इलेक्ट्रिकल पॉवर सिस्टिम विभागातर्फे राजीव गांधी अक्षय ऊर्जा दिन-२०१३ चे आयोजन विभागाच्या सिनर्जी ग्रुपतर्फे प्रत्येक वर्षाप्रमाणे या वर्षी ही करण्यात आले होते. सदर कार्यक्रम दि. १९ ऑगस्ट २०१३ रोजी सकाळी १०.०० ते ५.०० या वेळात तंत्रनिकेतनाच्या A.V. रूममध्ये ISTE चॅप्टरद्वारे करण्यात आला होता. सद्य परिस्थितीत उर्जेची नितांत गरज आहे आणि ती भागवण्यासाठी नैसर्गिक ऊर्जा स्तोत्र अत्यंत महत्त्वाची ठरत आहे. त्या करिताच ऊर्जास  बंधांची समाजाप्रती जाणीव होण फार महत्त्वाचे आहे. याच कारणास्तव विभागाच्या सिनर्जी ग्रुपतर्फे या दिनाचे आयोजना मागचा प्रमुख उद्देश आहे. माजी पंतप्रधान दिवंगत राजीव गांधीच्या वाढदिवसाचे औचित्य साधून दरवर्षी भारतात २० ऑगस्ट हा दिवस 'अक्षय ऊर्जा दिन' म्हणून साजरा केला जातो. ऊर्जा संबंधीची त्यांची मते फार उदात्त आणि विकसनशील भारताला पुढे नेण्यास फार महत्त्वाची होती.

सदर कार्यक्रमाची उद्दिष्टे अशी आहेत की तंत्रनिकेतनातीन विद्यार्थ्यांसाठी स्वतःची ऊर्जेसंबंधीची मते व्यक्त करण्यासाठी व्यासपीठ. पर्यावरण आणि ऊर्जाद्वारे अक्षय ऊर्जेसंबंधीची तरुणामध्ये नव-नवीन शोध आणि मते जाणून घेणे आणि ऊर्जे संबंधीच्या क्षेत्रात अशा करिअरच्या खूप संधी उपलब्धितेची जाणीव करून देणे इत्यादी.

सदरचा कार्यक्रमास महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ (MSBTE) मुंबई यांचा सहयोग आला. दरम्यान 'Emerging Technology in Renewable Energy' या मुख्य शीर्षकाखाली खालील विषयासंबंधी निबंध वाचन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

- Advanced Techniques in Renewable Systems.

- Green energy and environment.

- Nano Technology for green applications

- Advanced energy storage systems

- Design aspects for adaption of Renewable energy systems etc.

वरील शीर्षकानुसार झालेल्या निबंध स्पर्धेत चांगला प्रतिसाद लाभला. मुंबई विभागातील जवळ-जवळ ३० निबंधाचा समावेश होता. त्यामध्ये रत्नागिरीतील एका निबंधाचा समावेश होता. त्यातील २२ निवडक निबंध सादर करण्यात आले. मात्र सर्व निवडक निबंध हे 'अक्षय ऊर्जा दिन' या स्मरणिकेत प्रसिद्ध करण्यात आले आहेत.

सदरच्या कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ. आर. जी. करंदीकर (प्रमुख के. जे. सोमय्या कॉलेज ऑफ इंजिनियरिंग, विद्याविहार मुंबई) यांचे हस्ते करण्यात आले. सदर प्रसंगी त्यांनी विषयातील विविध स्पर्धात सहभागी होण्यासंबंधीची गरज, कौशल्य आणि विकास आणि स्लाईडद्वारे सादरीकरण कसे माहितीपर आणि आकर्षक होईल याविषयी उपस्थितांना आपले विचार मांडले. प्राचार्य दि. कृ. नायक (वि. प्र. मंडळाचे, तंत्रनिकेतन, ठाणे) यांनी प्रमुख आणि प्रचलित अशा अक्षय ऊर्जेसंबधीचे मुद्दे मांडले आणि बहुसंख्य विद्यार्थ्यांचा प्रतिसाद लाभल्याचे समाधान व्यक्त केले. सौ. एन. व्ही. वडेर (विभाग प्रमुख, वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतन, ठाणे) यांनाही उपस्थितीत विद्यार्थ्यांना ऊर्जेसंबंधी मोलाचे मार्गदर्शन केले.

वरील प्रमुख पाहुण्याचे शुभहस्ते स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले. श्री. डी. टी. नाईक (ऊर्जा सल्लागार) आणि श्री. संजय पाटकर (उद्योजक, सार्थ उद्योग) यांनीही उपस्थित विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले आणि परिक्षक म्हणून काम पाहिले.

**निबंध स्पर्धेत खालील विद्यार्थ्यांना पारितोषिके प्राप्त झाली-**

| पारितोषिके | निबंधाचे नाव | विद्यार्थ्याचे नाव | संस्थेचे नाव |
|---|---|---|---|
| प्रथम | Advanced techniques in Renewable energy systems | प्रतिक वाघ<br>मुग्धा सावंत | वि. प्रं. मं. चे तंत्रनिकेतन, ठाणे |
| द्वितीय | Green energy & environment, pollution free electricity generation | विष्णू आर.सी. विजयन | फादर अग्नेल तंत्रनिकेतन, वाशी, नवी मुंबई |
| तृतीय | Nano - Composites for hydrogen storage | धनश्री परब | फादर अग्नेल तंत्रनिकेतन, वाशी, नवी मुंबई |
| उत्तेजनार्थ | Green energy & environment, | गिरिजा दिक्षित<br>फाल्गुनी पाटील | वि. प्रं. मं. चे तंत्रनिकेतन, ठाणे |
| | Advance storage system for Renewable energy sources | मेधा वडजे<br>श्रृती अय्यर | विवेकानंद शिक्षण संस्थेचे तंत्रनिकेतन,चेंबूर, मुंबई |

जे कराल ते मनाने करा, ते चांगलेच होईल.

सर्व यशस्वीतांचे प्राचार्य आणि परिक्षक यांचेकडून स्मृति चिन्ह आणि सर्टीफिकेट देवून सत्कार करण्यात आला. ऊर्जा दिनाच्या आयोजनाच्या निमित्ताने नवीन पिढीला ऊर्जेसंबंधीची नव–नवीन माहिती आणि आव्हान व संधी इत्यादीची माहिती व्हावी हा प्रमुख उद्देश सफल व्हावा अशी धारणा आहे व ती सफल झाल्याचे अनेक उपस्थितांच्याद्वारे व्यक्त झाली विविध तंत्रनिकेतनातील विद्यार्थ्यांचा सहभाग मोठ्या प्रमाणावर दिला होता. दरम्यान आयोजकातर्फे सर्व मान्यवरांचे व स्पर्धेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांचे आभार व्यक्त करण्यात आले.

## डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था, ठाणे

**वार्षिक कार्यशाळा –२०१३**

दिनांक १२.१०.२०१३ रोजी ''विपणन क्षेत्रातील वैचारिक पालट'' (**"Paradigm Shift in Marketing"**) या विषयावर आधारित या वर्षीच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. कार्यशाळेची सुरुवात सरस्वती वंदना आणि दीप प्रज्वलनाने झाली व डॉ. अमित ओक (संचालक) यांनी आपले स्वागतपर भाषण सादर केले.

डॉ. गुरुप्रसाद मूर्ती (सर संचालक) यांनी या कार्यशाळेच्या विषयाच्या निमित्ताने केल्या गेलेल्या संशोधन प्रकल्पा संदर्भात माहिती देताना सांगितले की गेल्या वर्षी म्हणजेच ऑक्टोबर २०१२ मध्ये सहा. प्राध्यापिका सौ. पल्लवी चंदवासकर आणि सौ. रश्मी नडंगे यांनी अनुक्रमे केलेल्या या विषयावरील संशोधन आणि साहित्य सर्वेक्षण तसेच सहा. प्राध्यापक श्री. दीपक अग्निहोत्री व इतर अध्यापक सहकारी श्री. कैलाश चिटणीस, डॉ. विश्वास जोशी, अध्यापिका सौ. माला राज यांनी त्यांच्या व्यावसाईक अनुभवातून तयार केलेल्या संशोधन पर लेखांचा समावेश असलेल्या पुस्तिकेच्या प्रकाशनाने झाली. त्यानंतर या विषयावर आधारित २८ प्रश्न असलेली एक प्रदीर्घ प्रश्नावली तयार करण्यात आली आणि आमच्या २ विद्यार्थ्यांनी मे व जून २०१३ मध्ये ६६ विविध कंपन्यामध्ये जाऊन सर्वेक्षण केले व प्राथमिक माहिती (Primary Data) जमा केली आणि त्यानंतर या माहितीचे विशिष्ट सांख्यिकी पद्धतीद्वारे विश्लेषण करून मिळालेल्या निष्कर्षावर आधारित एक अहवाल तयार करण्यात आला व त्याचे प्रकाशन करण्यात आले.

त्यानंतर डॉ. पी. एम. केळकर (अधिष्ठाता) यांनी कार्यशाळेच्या विषया संदर्भात आपले विवेचन सादर केले व काळाच्या ओघात कुटुंब व्यवस्थेच्या, पालकत्वाच्या अनेक संकल्पना बदलल्या आहेत. आजकाल लहान मुले देखील कुटुंबात खरेदीच्या निर्णयात महत्वाची भूमिका बजावतात. तसेच इंटरनेटमुळे व्यवस्थापन संस्थांच्या जाहिरात तंत्रात तसेच विपणन पद्धतीत झालेले अमुलाग्र बदल इत्यादी मुद्दे त्यांनी ठळकपणे मांडले.

कार्यशाळेच्या प्रमुख अतिथी श्रीमती सोनिया महाजनी (co-founder of Market Vistas) यांनी आपल्या बीज भाषणात Paradigm Shift in Marketing या विषयावर आपले विचार मांडले. त्यांच्या मते या क्षेत्रात आज काल एखाद्या वस्तूची किंवा उत्पादनाची ग्राहक संख्या किती त्यापेक्षा त्या वस्तूचा किंवा उत्पादनाचा ग्राहक कोणत्या प्रकारचा आहे याला जास्त महत्त्व आहे. तसेच या क्षेत्रातील विपणन नियंत्रण, उत्पादन निर्णय क्षमता, वितरण, विपणन व्यूहरचना किंबहुना बाजाराचे सर्वेक्षण या सर्वच पद्धतीमध्ये झालेले बदल इत्यादी मुद्द्या संदर्भात अनेक उदाहरणे देऊन आपले अनुभव त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले.

त्यानंतर सर्वेक्षणातून मिळालेल्या माहितीचे सांख्यिकीय विश्लेषण करणाऱ्या आमच्या संस्थेच्या सहा. प्राध्यापिका सौ. स्वप्ना ताम्हणकर यांनी या विश्लेषणासाठी वापरण्यात आलेल्या पद्धती, अनुमान, निष्कर्ष, अडचणी इत्यादी संदर्भात आपली मते मांडली.

जरी सुख प्राप्तीसाठी धडपडत असले तरी अपेक्षेप्रमाणे सगळे मिळेलच असे नसते.

या सर्वेक्षणातील निष्कर्षांच्या संदर्भावरुन आमच्या विपणन विभागाचे सहा. प्राध्यापक दीपक अग्निहोत्री, सहा. प्राध्यापिका सौ. पल्लवी चंदवासकर व सहा. प्राध्यापिका कु. शोभना पाणीकर यांनी Paradigm Shift in Marketing या विषयावर आपली मते मांडली यामध्ये विपणन क्षेत्रातील कार्यपद्धतीत किंवा संकल्पना संदर्भात झालेले बदल जसे 4Ps to 8Ps, consumerism to sustainability, mass production to mass customization, urban to rural market strategy, paradigm shift from Transactional to Relationship marketing, brand extensions, product-centric to customer centric marketing. Cyberspace / Virtual market-place, from Conventional Media to Non-Conventional Media, from 30 Sec TV Slot to 30 Sec You tube video, In-film Placement of products / Services from only Word-of-Mouth to Blogging इत्यादी मुद्द्यांवर त्यांनी सादरीकरण केले.

यानंतर Paradigm Shift in Marketing या विषयावर एका छोट्या परिसंवादाचे आयोजन करण्यात आले यामध्ये श्री. कैलाश चिटणीस, डॉ. विश्वास जोशी, अध्यापिका सौ. माला राज, श्री. ओमकार सावंत अशा विपणन क्षेत्रातील मान्यवरांचा समावेश होता. त्यांनी विपणन क्षेत्रातील स्थित्यंतराची कारणे, ग्राहकांची बदललेली मानसिकता, ग्राहक संपर्क, ग्राहक जागरुकता इत्यादी मुद्द्यांवर चर्चा केली.

कार्यशाळेच्या दुसऱ्या सत्रात विपणन (Marketing) शाखेच्या विद्यार्थ्यांनी सर्वेक्षणातील प्रश्नावलीतील काही विशिष्ट प्रश्नांनुसार त्यांच्या उत्तरांचे विश्लेषण सादर केले तर व्यवस्थापनाच्या इतर जसे वित्त (Finance), प्रचलन (Operations), मानव संसाधन (HR) आणि माहिती तंत्रज्ञान (IT) अशा सर्व विभागांवर विपणन क्षेत्रातील वैचारिक पालटाचा (Paradigm Shift in Marketing) होणारा परिणाम या मुद्द्यावर त्या त्या शाखेच्या विद्यार्थ्यांच्या गटांनी सादरीकरण केले.

आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

## राष्ट्रीय प्रचलन संमेलन २०१३
## National Operations Summit 2013

दिनांक २८.९.२०१३ रोजी विद्या प्रसारक मंडळाच्या डॉ. व्ही. एन. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था ठाणे या संस्थेतर्फे संस्थेच्याच पाणिनी सभागृहात या वर्षीच्या ''उत्कृष्ट प्रचलन क्षेत्रातील नेतृत्व'' ("Leadership in Operations Excellence") या विषय सुत्रावर आधारित राष्ट्रीय प्रचलन संमेलन २०१३ चे आयोजन करण्यात आले.

या संमेलनाद्वारे विद्यार्थ्यांना प्रसिद्ध उद्योग व्यवसायातील तसेच शैक्षणिक क्षेत्रातील अनुभवी आणि तज्ञ व्यक्तींकडून प्रचलन व्यवस्थापन या विषयातील विविध पैलूंबाबत खूप काही शिकण्याची संधी मिळाली. यामध्ये प्रत्यक्ष उत्पादन क्षेत्रातील अद्ययावत मुद्द्यांवर आधारित अनुभवी तज्ञांच्या व्याख्यानाचा समावेश होता.

संमेलनाचे प्रमुख अतिथी श्री. सुनील जोशी (Director, Tekman India Pvt. Ltd.) यांनी आपल्या बीजभाषणात अत्यंत सोप्या शब्दात संमेलनाच्या विषय सूत्रा संदर्भात आपली मते मांडली. तसेच इस्पितळे आणि शाळा यांच्या प्रशासनासंबंधी उदाहरणे देऊन अनेक मुद्दे समजावून सांगितले यामुळे विषय सूत्राची सुसंगतता साधणे विद्यार्थ्यांना सोपे गेले.

संमेलनातील दुसरे वक्ते श्री. पिनाक देशमाने (Head Operations & IT, TIWBL) यांनी Demand Driven Supply Networks या पुरवठा साखळी व्यवस्थापन क्षेत्रातील अत्याधुनिक पद्धतीबाबत विस्ताराने माहिती दिली आणि पुरवठा साखळी व्यवस्थापनाच्या सुरुवातीपासून ते आताच्या cloud computing पर्यंतच्या या क्षेत्राचा प्रवास मुद्देसूतपणे समजावून सांगितला. सद्यस्थितीत बाजारातील सततच्या बदलत्या परिस्थितीमुळे पुरवठा साखळी क्षेत्रात कायम सतर्कता आणि चपळता

राखणे तसेच ग्राहक केंद्रित असणे अत्यावश्यक झाले आहे असेही त्यांनी सांगितले.

त्यानंतर डॉ. विजय महाजनी (Professor, ICT Mumbai) यांनी प्रकल्प व्यवस्थापन या विषयावर आपली मते मांडली. त्यांच्या मते प्रकल्प व्यवस्थापन म्हणजे एका कल्पनेचे वास्तवात रुपांतर करणे आणि यालाच त्यांनी "Conception to Commissioning" असे संबोधले. थोडक्यात मनुष्यबळ, साधनसामग्री, पैसा आणि वेळ यासर्व संसाधनाचे यशस्वी व्यवस्थापन म्हणजेच प्रकल्प व्यवस्थापन असे त्यांनी सांगितले.

संमेलनातील चौथे वक्ते श्री. आर. श्रीधर (Advisor - Reliance Industries Ltd - Group Manufacturing Division) यांनी Productivity Improvement Techniques in manufacturing sector" या विषया संदर्भात सादरीकरण केले व उत्पादन क्षमता सुधारण्यासंबंधीचे महत्वाचे टप्पे याबद्दल माहिती दिली.

यानंतर संमेलनातील शेवटचे वक्ते श्री. शरद के. तळवलकर (DGM (Supplier Quality Improvement) L&T) यांनी 5 S and Lean Manufacturing या विषयावर सादरीकरण केले. त्यांनी स्वतः L&T या कंपनीतील ११ विभागांमध्ये 5 S या प्रणालीची यशस्वी अंमलबजावणी केली असल्याने याबद्दलचे अनेक अनुभव त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले. त्यांच्यामते या स्वच्छ करा आणि नीट मांडणी करा यासारख्या सोप्या पद्धतींचा अवलंब करून उद्योग संस्थांच्या उपलब्ध कार्यक्षेत्र संरचनेत 5 S ही प्रणाली राबवणे खूप कायद्याचे ठरते असे मत त्यांनी व्यक्त केले.

डॉ. व्ही. एन. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्थेचे संचालक डॉ. अमित पद्माकर ओक, सर संचालक डॉ. गुरुप्रसाद मूर्ती, अधिष्ठाता डॉ. पी. एम. केळकर यांनी देखील संमेलनाच्या विषया संदर्भात आपली मते मांडली.

संमेलनाच्या शेवटच्या सत्रात या संमेलना प्रित्यर्थ आयोजित online प्रश्न मंजुषा स्पर्धा आणि चित्रफित स्पर्धेच्या विजेत्या स्पर्धक विद्यार्थ्यांना पारितोषिके आणि प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली.

सहा. प्रा. ज्योत्स्ना गोल्हर (Event coordinator Dr. V. N. Brims)

●●●

## पसायदान

आतां विश्वात्मकें देवें । येणें वाग्यज्ञें तोषावे ।
तोषोनि मज द्यावे । पसायदान हें ।। १ ।।

जे खळांची व्यकटी सांडो । तया सत्कर्मी रति
वाढो । भूतां परस्परें पडो । मैत्र जीवांचे ।।२ ।।

दूरिताचे तिमिर जावो । विश्व स्वधर्मसूर्ये पाहो जो
जे वांछिल तो तें लाहो । प्राणिजात ।।३।।

वर्षत सकळमंगळी । ईश्वरनिष्ठांची मांदियाळी ।
अनवरत भूमंडळी । भेटतु भूतां ।। ४ ।।

चला कल्पतरूंचे आरव । चेतना चिंतामणीचे
गांव । बोलते ते अर्णव । पीयूषाचे ।। ५ ।।

चंद्रमे जे अलांछन । मार्तंड जे तापहीन ।
ते सर्वाही सदा सज्जन । सोयरे होतु ।। ६ ।।

किंबहुना सर्व सुखी । पूर्ण होऊनि तिही लोकीं
।भजिजो आदिपुरुखीं । अखंडित ।।७ ।।

आणि ग्रंथोपजीविंये । विशेषीं लोकीं इयें ।
दृष्टादृष्ट विजयें । हो आवें जी ।। ८ ।।

येथ म्हणे विश्वेश्वरावो । हा होईल दानपसावो ।
येणें वरें ज्ञानदेवो । सुखया जाला ।। ९ ।।

(अध्याय अठरावा : ओवी क्र. १७९३ ते १८०१)

# जाहीर आवाहन

**विद्या प्रसारक मंडळ, ठाणे :**

विद्या प्रसारक मंडळ १९३५ सालापासून गेली सुमारे ७५ वर्षे ठाण्यात शैक्षणिक प्रसाराचे कार्य करीत आहे. आधुनिक पद्धतीचे व जागतिक दर्जाचे अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करण्याचा मंडळाचा मानस आहे.

**कोकण परिसराची निवड :**

एका बाजूला समुद्रकिनारा व दुसऱ्या बाजूला सह्याद्रीच्या रांगा यांच्या मधील या पट्ट्यातील जनता गेली सुमारे ४०० वर्षे उत्पादन क्षमता नसल्यामुळे जगण्यासाठी झगडत असते. पर्यटन व्यवसाय हाच काय तो व्यवसाय त्यांना थोडीफार साथ देत असतो.

कोकणातल्या रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांची एकूण लोकसंख्या जवळ जवळ ३० लाख आहे. तरी सुद्धा उच्च शिक्षणामध्ये दोन्ही जिल्हे मागास म्हणून गणले जातात आणि त्याचे कारण म्हणजे, उच्च शिक्षणाकडे कमी वळतात हे आहे. २००७ साली दिल्लीच्या विद्यापीठ अनुदान आयोगाने स्थापन केलेल्या एका समितीने संपूर्ण देशभर याविषयावर सर्वेक्षण करून आपला अहवाल सादर केला होता. त्या अहवालात संपूर्ण देशात ज्या भागामध्ये पुढे येण्याची प्रवृत्ती दिसत नाही, अशा भागांत आधुनिक धर्तीवर महाविद्यालये मोठ्या संख्येने निर्माण केली पाहिजे असे मत मांडले होते. भारताची उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्यांची सरासरी फक्त १२.४ आहे. त्या समितीला असेही आढळून आले की ५९३ जिल्ह्यांपैकी ३७४ जिल्हे असे आहेत की त्याठिकाणी उच्च शिक्षणासाठी काहीच सोयी नाहीत. महाराष्ट्र राज्यात उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्यांच्या टक्केवारीचे प्रमाण १७.३३ टक्के असून रत्नागिरी जिल्ह्याची उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची टक्केवारी सर्वांत कमी आहे.

उच्चशिक्षण देणाऱ्या ७० टक्के संस्था एक तर मोठ्या शहरांत किंवा नागरी भागांत आहेत. याचे मुख्य कारण तेथील विद्यार्थ्यांना खर्चिक उच्च शिक्षण घेणे परवडते व शिक्षणासाठी आवश्यक शिक्षकवर्गही उपलब्ध होतो. यामुळे ग्रामीण भागांतील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी मोठ्या शहरातील महाविद्यालयांमध्ये जावे लागते. यावर उपाय एकच, की अशा प्रकारच्या संस्था आणि उच्च दर्जाचे शिक्षण देणारी महाविद्यालये ही ग्रामीण भागात काढली जावीत. यासाठी आवश्यक त्या मुलभूत सोयी सुविधा उपलब्ध करणे व त्यासाठी लागणारा खर्च करणे यांची पूर्तता करावी लागते. त्यामुळे गरजू व हुशार ग्रामीण विद्यार्थ्यांची सोय तर होईल; पण त्या ग्रामीण भागाचा मोठ्या प्रमाणावर विकास घडून येईल. तिथल्या लोकांचा फायदा व गरजूंना कामधंदे उपलब्ध होतील आणि त्या ग्रामीण भागाचे महत्त्वही वाढेल.

**विद्या प्रसारक मंडळाच्या नवीन प्रकल्पविषयी:**

**कोकणातील गुहागर जवळ असलेला वेळणेश्वर हा ग्रामीण भाग मंडळाने नियोजित शैक्षणिक प्रकल्पासाठी निवडला आहे.** त्या गावची लोकसंख्या जवळपास ३५०० आहे व अशा गावात सुमारे ६५ एकर वरकस जमीन मंडळाने खरेदी केली आहे. तेथे एक शंकराचे सुरेख मंदिर आहे. त्याला वेळणेश्वर असे नाव आहे. शिवाय अरबी समुद्राची किनारपट्टी ही या गावाला लागून आहे. सरकारच्या नियोजित आराखड्याप्रमाणे लवकरच तयार होणार सागरी किनारपट्टी महामार्गही वेळणेश्वर गावाच्या बाजूने जाणार आहे.

या वास्तू समूहामध्ये ६ शैक्षणिक विभागांसाठी स्वतंत्र इमारती, प्राचार्य व प्रबंधकासाठी बंगले, विषय प्रमुख व प्राध्यापक व प्रमुख कर्मचारी यांच्यासाठी स्वतंत्र वास्तू

---

आणि विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे व इतर संबंधित वास्तू असे सर्व मिळून दहा लाख चौरस फुटांचे बांधकाम असलेला प्रकल्पाचा पूर्ण **खर्च १५० कोटी रुपये पर्यंत अपेक्षित आहे**. त्यामध्ये ३००० विद्यार्थी निरनिराळ्या विभागांतून शिक्षण घेतील. शिक्षकी पेशातील, कार्यालयीन कर्मचारी, शास्त्रीय व इतर विषयांचे तंत्र आणि सादिलवार कामे करणारे असे सर्व मिळून १००० व्यक्ती असतील. शिवाय वरील अनुषंगाने इतर कामे करण्यासाठी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष इतरही व्यक्तींची वर्दळ वाढेल. याशिवाय, प्रकल्प सुरू झाल्यानंतर प्रकल्पा बाहेरच्या व्यक्तींनासुद्धा वाव मिळेल.

प्रकल्पाचा कल्पकतापूर्ण आराखडा जो ३००० विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी तयार केला आहे. त्याला चिपळूणच्या सहाय्यक जिल्हाधिकाऱ्यांनी मंजुरी दिली असून, त्याचा पहिला टप्पा २०१२ पर्यंत पूर्ण होणार आहे. सुरुवातीला ३०० विद्यार्थ्यांना प्रवेश अपेक्षित असून अभियांत्रिकीचा एकूण ४ वर्षाचा पदवी अभ्यासक्रम असेल. २०१२-१३ शैक्षणिक वर्षापासून अभियांत्रिकी महाविद्यालय चालू करण्यात येणार आहे. त्यानंतर नव्याने अभियांत्रिकी, व्यवस्थापन, वास्तुशास्त्र आणि हॉटेल व्यवस्थापन याप्रमाणे नवीन अभ्यासक्रम सुरू होतील.

**देणगीसाठी व मुदत ठेवीसाठी आवाहनः**

मंडळाला दानशूर, समाजसेवक, उदारमताच्या व्यक्ती, यांच्याकडून मिळणाऱ्या आर्थिक मदतीशिवाय दुसरा कोणताही उत्पन्नाचा मार्ग नाही. तुटपुंज्या फीच्या उत्पन्नामध्ये अशी नवीन महाविद्यालये निर्माण करणे शक्य नाही आणि म्हणून या सर्व बांधकामासाठी लागणारा आर्थिक पुरवठा बँकांकडून कर्ज घेऊन व जनतेकडून देणारी स्वरूपात मदत घेऊन करण्यात येतो.

नियोजित अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या बांधकामासाठी बँकेकडून मिळणाऱ्या कर्जाव्यतिरिक्त लागणारा निधी उपलब्ध करण्यासाठी रु. १० कोटींपर्यंत खालील अटींवर वैयक्तिक ठेवी स्वीकारण्यास धर्मादाय आयुक्त, मुंबई यांनी मान्यता दिली आहे.

१) संस्थेकडे ठेवण्यात येणाऱ्या ठेवी या कमीतकमी रु. ५०००/- त्याच्या पटीत स्वीकारण्यात येतील.

२) सदर ठेवीचा कालावधी ५/७ व १० वर्षाचा असेल. किमान ३ वर्षांपर्यंत ठेव परत केली जाणार नाही.

३) ठेवीसाठी वारसदार नेमणे आवश्यक असेल.

४) ठेवीच्या कालावधीत ठेवीदाराचा मृत्यू ओढवल्यास त्याच्या वारसास पंधरा दिवसात ठेव परत करण्यात येईल.

५) सदर ठेवीवर दरसाल दर शेकडा ५ टक्के सरळ व्याज दराने प्रत्येक वर्षाच्या मार्च महिन्याच्या अखेरीस व्याज देण्यात येईल.

६) काही अपरिहार्य कारणामुळे मुदतीपूर्वी ठेव मोडावयाची असल्यास, ठेवीदाराने ३ महिन्याची आगाऊ सूचना देणे आवश्यक असेल व ती मुदत ठेव ठेवल्यापासून सहा महिन्याच्या आत मोडल्यास त्यावर व्याज अनुदेय राहणार नाही.

या प्रकल्पावरती पुढील १० वर्षात सुमारे १५० कोटी रुपये खर्च होईल. हा प्रकल्प पूर्णत्वास जाणे हे त्यावेळेसच शक्य होईल, जेव्हा सर्व स्तरांतील दानशूर व्यक्ती व संस्थांचा हातभार लागेल. **या आवाहनातर्फे आम्ही आपणांस विनंती करतो की आपण अशा शैक्षणिक कार्यास सढळ हस्ते देणगी किंवा मुदत ठेवीच्या स्वरूपात मदत करावी व मंडळाच्या या राष्ट्रीय स्वप्नपूर्तीस हातभार लावावा.**

आपला विश्वासू,
**डॉ. विजय बेडेकर**
कार्याध्यक्ष
विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

●●●

आयुष्य पत्त्याच्या खेळाप्रमाणे आहे.

# स्वप्न साकारत आहे...



हे स्वप्न नव्हे एका व्यक्तीचे ! ते आहे समाजातील विचारवंतांचे,
हे स्वप्न नव्हे महंमदी मनोऱ्याचे, ते आहे श्रमिक योजनांचे
हे स्वप्न नव्हे खुशालवंतांचे, नव्हे ते आरामितांचे
नसे ते फावल्या क्षणांचे, गुलजार गादीत विसावतांचे
ते असे अहर्निश श्रमांचे, तसे ते असे श्रमोपासकांचे,
सदा ध्येयध्यासीं मग्न त्यांचे !
हे स्वप्न नव्हे व्यक्तिवैभवाचे, नसे ते आत्मगौरवाचे,
ते असे समाजोन्नतीचे, असे ते युवागौरवाचे
हे स्वप्न न दिसे एका क्षणीं, न एका दिनीं,
न एके यामिनी
दिनरात्र मानसी स्फुरे, सतत निद्रानाशही तें करी !
हे स्वप्न नसे सानुले, नसे ते चौकटी बांधिले
ते असे, भव्यता जयाची महान, सीमा जयाची अस्मान !
हे स्वप्न जसे आमुचे, असावे तसे उपस्थितांचे,
मुदित मनीं सुस्वागत अपुलें करितां
स्वप्न दिसे साकारले
आणि हे स्वप्न कसे आहे ते पहा –
ओसाड भूमी कर्दमीं जिथे घाण
द्वीप साजिरे आज तेथे दृश्यमान
ज्ञानसूर्य येथे उगवला, अज्ञान अंधार लोपला,
दिनरात्र प्रकाश अर्पी, अस्त न जया कल्पिला.
भव्य वास्तू इथे साकारती, दृश्य जयाचें महान,
शिल्पही जयांचे विशेषज्ञान देखिती
मनी जे सुजाण,

दृश्य देखतां जाणवे भव्यता, प्रासाद जणूं सरस्वतीचा,
ज्ञानवीणा जिथे झंकारे सदासर्वदा,
बगीचे जिथे बहरती फुलाफुलांचे रंगरंगती,
उद्यानीं बहरती ताटवे, कारंजी जिथे फवारती.
युवायुवतींचे मग्न घोळके, स्वप्न रंगवितां मग्न जे मानसी
स्वप्न तयांचे आकार घेई, अनुरागप्रारंभ येथेच होई
आचार्य आणि प्राचार्य, सदा इथें रंगती
विज्ञानसत्रीं सदा जयांची वाहिली मती,
कलावंत, सरस्वतीचे तन्मणी, तसे वैज्ञानिक महान्,
इथे जन्मती प्रतिभा जयांची देदीप्यमान
भूदल–सागर–सैनिक, वायुपुत्रही इथे निर्मिती
शक्तियुक्ति जयांची भारतमातेप्रती
नवमानव, नवनागरिक, प्रयत्नीं इथे घडतसे
सत्य, शिव, सुंदर जयांचे अणुरेणीं वसे.
बालके तव शिशुमंदिरी दाखल होतां,
विद्यामंदिरी दौड तयाची न रोखितां
नवयुवक हा प्रवेशितां विद्येचे महाद्वार
स्वप्न आमुचे तयाभोवती होई साकार
नवयुवक हा भारतभूचा सुपुत्र व्हावा,
बुद्धि जयाची, शक्ति जयाची भारतभूचा ठेवा

– डॉ. वा. ना. बेडेकर

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006


# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- *अत्याधुनिक दृक् श्राव्य यंत्रणा*
- *वातानुकूलित प्रसन्न वातावरण*
- *वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा*

*अशा सुविधांनी युक्त*

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत, ३ रा मजला | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि.प्र.मं.चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

## ❊ संपर्क ❊

कार्यवाह

**विद्या प्रसारक मंडळ**

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे – ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक – २५४२६२७०


हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे-४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.